१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार २ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-२७, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 27 Marathi - Daily - Mumbai, 2 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

NASA चे 'आर्टेमिस २' मिशन!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### व्यावसायिक गॅस सिलिंडर १९५ रुपयांनी महाग

**नवी दिल्ली -** इस्त्रायल इराण युद्धाचा फटका संपूर्ण जगाला बसत आहे. आज केंद्र सरकारने एटीएफ म्हणजे विमानाच्या इंधनाच्या किमती ८.५ टक्के ने वाढवल्या आहेत. मात्र सरकारने देशांतर्गत विमान तिकीट महाग होऊ नये यासाठी स्थानिक विमान उड्डाणांच्या इंधन किमतीत सवलत दिली आहे. इंधनाच्या किमती बरोबर सरकारी कंपन्यांनी आज व्यावसायिक एलपीजीच्या दरात १९५.५० रुपयांनी वाढ केली आहे. ही वाढ



१९ किलोच्या सिलिंडरसाठी आहे. यामुळे हॉटेलात मिळणारे अन्न महागणार आहे. दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरची किंमत आता २०७८.५० झाली आहे. छोट्या सिलिंडरची किंमत १५ रुपये वाढली आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत तूर्त वाढ केली नाही हा दिलासा आहे. मात्र प्रीमियम पेट्रोलच्या दरात प्रतीलिटर ११ रुपये तर प्रीमियम डिझेलच्या दरात दीड रुपयाने वाढ करण्यात आली.

# अजितदादांच्या निधनानंतर 'डिझाईन बॉक्स'वाले नरेश अरोरा कुठे गेले?



**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार अमोल मिटकरी यांनी पक्षाच्या निवडणूक रणनीतीशी संबंधित कंपनी 'डिझाईन बॉक्स'चे प्रमुख नरेश अरोरा यांच्यावर एक्स पोस्टच्या माध्यमातून पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला.अजितदादांच्या निधनानंतर हा डिझाईन बॉक्सवाला गडी कुठे गायब झाला, असा सवाल करत मिटकरींनी अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी अरोरा यांची कसून चौकशी व्हावी, अशी मागणी केली.**

## आ.अमोल मिटकरींचा हल्लाबोल

■ मुंबई


**अजित** पवारांच्या निधनानंतर चर्चेतील मुख्य परंतु लक्ष नसलेले पात्र, अशा शब्दात अरोरा यांचा उल्लेख मिटकरींनी केला.अजित पवार यांनी लढवलेल्या निवडणुका आणि त्यातील अरोरा यांच्या कामाचे मिटकरींनी अक्षरशः वाभाडे काढले. दहा-बारा फोटोग्राफर लावणे आणि अजित पवार यांना गुलाबी जॅकेट घालायला लावणे यापलीकडे निवडणुकांमध्ये अरोरांचे कोणतेही ठोस योगदान नव्हते, असा दावा मिटकरींनी केला. ते म्हणाले की, अजित पवार यांच्या विमानाला अपघात की घातपात » पान ७ वर



# इराण युद्धातून डोनाल्ड ट्रम्प माघार घेतील का?

## आज सकाळी ६ वाजता देशवासियांना संबोधन

**युद्ध सुरू होऊन ३३ दिवस उलटले तरी नमते घेण्यास तयार नसलेल्या इराणमुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हतबल झाले आहेत. मित्र राष्ट्रांनी मदत करण्यास स्पष्ट नकार दिल्याने एकाकी पडलेले ट्रम्प या युद्धातून माघार घेण्याच्या मनस्थितीत आले आहेत अशी चर्चा आहे. भारतीय वेळेनुसार उद्या सकाळी सहा वाजता ट्रम्प देशवासियांना संबोधित करणार आहेत. यावेळी ते युद्ध समाप्तीची घोषणा करतील अशी दाट शक्यता आहे. यामुळे उद्याच्या घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



■ वॉशिंग्टन

युद्ध सुरू झाल्यापासून ट्रम्प यांनी अनेक उलटसुलट दावे केले आहेत. इराणची पूर्ण लष्करी ताकद आम्ही नष्ट केली आहे, इराणकडे आता नौदलही शिल्लक राहिलेले नाही, इराणचे सर्व प्रमुख नेते ठार झाले आहेत, युद्धात आमचा विजय झाला आहे, इराणवर हल्ला करण्यासारखे आता काहीही शिल्लक राहिलेले नाही, अशा प्रकारचे दावे ट्रम्प यांनी केले. मात्र त्याचवेळी इराण पूर्ण ताकदीनिशी इस्त्रायल आणि आखाती देशांमधील अमेरिकेच्या तळांवर क्षेपणास्त्र डागत राहिला. त्यामुळे ट्रम्प यांचे दावे पोकळ आहेत हे जगाला दिसले. होर्मुज सामुद्रधुनी आपल्या ताब्यात ठेवून इराणने जगासमोर मोठे तेलसंकट निर्माण करीत ट्रम्प यांना तोडीसतोड » पान ७ वर

## भोंदूबाबा अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ नाशिक



**राज्यभरात** खळबळ उडवून देणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला नाशिक न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून पोलीस कोठडीत असलेल्या खरातची मुदत संपल्यानंतर आज त्याला कडक पोलीस बंदोबस्तात नाशिक न्यायालयात हजर करण्यात » पान ७ वर

## अमेरिकेच्या १८ कंपन्यांवर इराणकडून हल्ले सुरू

■ तेहरान

**इराणने** अमेरिकेच्या १८ कंपन्यांवर हल्ला करण्याची धमकी देऊन बाहरीन येथील ॲमेझॉन कंपनीच्या कार्यालयावर पहिला हल्ला केला. आज इराणने ई-कॉमर्स क्षेत्रातील दिग्गज अमेरिकन कंपनी ॲमेझॉनच्या बहारीनमधील एडब्ल्युएस कार्यालयावर » पान ७ वर

## ओरॅकलने ३०,००० कर्मचारी झटक्यात काढले १२,००० भारतीय! पहाटे मेल पाठवून कपात

■ नवी दिल्ली

**काही** आठवड्यांपासून सुरू असलेल्या चर्चेनंतर 'ओरॅकल' या बहुराष्ट्रीय कंपनीने मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करण्यास सुरूवात केली आहे. आज कंपनीने आपल्या ३०,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले. यात १२,००० भारतीय कर्मचारी असल्याचे सांगितले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कुठलीही पूर्वसूचना न देता कंपनीने कर्मचाऱ्यांना पहाटे पाच-सहा वाजताच्या सुमारास ईमेल पाठवून, तुम्हाला नोकरीवरून काढण्यात येत आहे. आज तुमचा शेवटचा दिवस असल्याचे कळवले. ही कर्मचारी कपात ओरॅकलच्या » पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



नवाकाळ





# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

महानगर गॅस कंपनीच्या एजंसीला मीटर रिडींगच्या कामासाठी फिल्ड एक्झिक्युटीव्ह (बायकर) त्वरीत पाहिजेत. पगार- 22,000/- + 3,000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस. **9820385767 / 7208993036** {NC254699}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC254722}

कुरीअर कंपनीला अनुभवी मुंबई, ठाणे साठी पिकअप आणि डिलीव्हरी बॉय पाहिजे अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर मुलगी पाहिजे मो. **9223240648/ 9223421540** {NC254739}

ऑफसेट प्रिंटिंग मशीनवर प्रिंटर, फिडरमेन, बॉलर पाहिजेत. गोरेगाव (ईस्ट). **9820039302.** {NC254666}

चॉकलेट्स केक पॅकींगसाठी मुले/मुली पाहिजेत. पगारः 18,000- 25,000 संपर्कः **9004628452** {NC260006}

मुंबई, नवीमुंबई आणि ठाणे विभागाची माहिती असलेला असिस्टंट सुपरवायझर पाहिजे. पगार 23,000/-+ 2000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस. संपर्क- **9820385767/ 7208993036** {NC260005}

अनुभवी / शिकाऊ वायरमन / इलेक्ट्रिशियन हवे आहेत. त्वरित भेटाः मधु इलेक्ट्रिकल्स ऑफिस नं.२, तळ मजला, कृष्णा कुंज, प्लॉट नं.४४, रोड नं.२५, सुंदरम मोटर ट्रेनिंग स्कूल जवळ. सायन सर्कल, मुंबई-२२. संपर्क क्रमांकः **9821056369 / 7303222826** {NC260001}

## पाहिजेत

डिलिव्हरी कामासाठी माणसे पाहिजेत पत्ताः Spanta Tower लोअर परेल स्टेशनच्या समोर, लोअर परेल-ईस्ट संपर्क 10.30 am to 7.00 P.M. **9820117812** {NC260002}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाइसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्कः **9920925129** {NC260003}

गोरेगाव आणि अंधेरी कंपनीमध्ये ऑफिस बॉय आणि फिल्ड एक्झिक्युटिव्ह मुले पाहिजेत **9920480316** {NC260004}

मुंबईमध्ये लिफ्ट इन्स्टॉलेशन आणि हेल्परसाठी मुले पाहिजेत आकर्षक पगार.ः वर्गीस बने. **9869085202** {NC2560007}

## जागाविषयक

दादर (पूर्व) स्टेशन नजिक ऑफिस करता जागा भाड्याने उपलब्ध. समर्थ- **9372532829** {NC254741}

## फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन/ ट्रेनिंग)ः **9136034519, 8369152017** {NC254638}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

-मॅनेजर, 'नवाकाळ'

# खरातच्या मुलाला एसआयटीने चौकशी करून सोडून दिले

■ नाशिक

**शिर्डीतील** जमीन गैरव्यवहार प्रकरणी नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याचा मुलगा हर्षवर्धन खरात याला काल रात्री नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाने ताब्यात घेतले होते. मात्र त्याची चौकशी करून एसआयटीने रात्री उशिरा त्याला सोडून दिले. शिर्डीतील चार एकराचा भूखंड खरेदी गैरव्यवहारप्रकरणी रावसाहेब गोंडकर यांनी स्थानिक पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी खरात आणि त्याची पत्नी कल्पना हिच्यासह पाच आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास करत असलेल्या एसआयटीने या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करताना कल्पना खरात हिला अटक करण्यासाठी तिच्या घरावर धाड टाकली असता ती घरातून फरार झाल्याचे आढळून आले. मात्र खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात हा घरात सापडला. त्याला पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली. त्याच्या जबाबातून काही महत्त्वपूर्ण माहिती मिळाल्याचे सूत्रांनी सांगितले. शिर्डीतील निघोजमध्ये असलेला हा चार एकराचा भूखंड खरेदी करण्याच्या नावाखाली खरात आणि अन्य आरोपींनी जमीन मालकाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली, असा आरोप आहे.



# भारताने चिनी बनावटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी कडक निर्बंध लागू केले

■ नवी दिल्ली

**भारताने** इंटरनेटशी जोडलेल्या चिनी सीसीटीव्ही कॅमेरे आणि संबंधित हार्डवेअरवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे, विशेषतः हिकविजन आणि डाहुआ आणि टीपी- लिंक सारख्या चिनी कंपन्यांना या निर्णयाचा फटका बसला आहे.

आजपासून लागू झालेल्या नव्या नियमांनुसार, भारतात विक्रीपूर्वी सर्व सीसीटीव्ही उत्पादनांना आवश्यक मंजुरी घेणे बंधनकारक आहे. हा निर्णय इंटरनेटशी जोडलेल्या उपकरणांसाठी सुरक्षा नियम कडक करण्याच्या व्यापक सरकारी प्रयत्नांचा भाग आहे. कारण ही उपकरणे हॅकिंगसाठी संवेदनशील असल्यामुळे देखरेख साधन म्हणून वापरली जाऊ शकतात. अधिकाऱ्यांच्या या कंपन्यांच्या उत्पादनांना तसेच चिनी चिपसेट वापरणाऱ्या उपकरणांना प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याचे समजते. मंजुरीशिवाय अशी उत्पादने भारतीय बाजारात विक्रीसाठी बंदी घालण्यात आली आहे.

या नियमांनुसार उपकरणांमध्ये हार्डकोडेड पासवर्ड किंवा गुप्त बॅकडोअर नसावेत सुरक्षित फर्मवेअर आणि अपडेट यंत्रणा असावी. मजबूत एन्क्रिप्शनद्वारे डेटा संरक्षण असावे. हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर स्तरावर छेडछाड रोखली जावी.

२०२१ मध्ये सरकारने संसदेत सांगितले होते की सरकारी संस्थांमध्ये बसवलेले सुमारे १० लाख कॅमेरे चिनी कंपन्यांचे आहेत. तसेच व्हिडिओ डेटा परदेशी सर्व्हरवर पाठवला जात आहे.अलीकडेच इराण- अमेरिका संघर्ष इस्त्रायलमधील चेक पॉईंट या सुरक्षा कंपनीने मध्यपूर्वेत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर हॅकिंगचे अनेक प्रयत्न झाल्याचे सांगितले आहे.

# वंदे भारतमधील जेवण खाल्ल्याने तब्येत बिघडली! महिलेची तक्रार

■ नवी दिल्ली

**वंदे भारत** एक्स्प्रेसमधील जेवणाच्या दर्जावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. रांची येथील रहिवासी आयुषी सिंह यांनी ट्रेनमधील हे जेवण खाल्ल्यानंतर स्वतःची आणि आपल्या दोन वर्षांच्या मुलाची प्रकृती बिघडल्याचा गंभीर आरोप केला आहे.

आयुषी सिंह २७ मार्च रोजी वाराणसी-देवघर वंदे भारत एक्स्प्रेसने प्रवास करत होत्या. त्यांनी एक्स पोस्ट करत म्हटले की, जेवण घेतल्यानंतर त्यांना तीव्र स्वरूपाची लर्जी झाली, तर त्यांच्या लहान मुलाला जुलाबाचा त्रास झाला. रेल्वेमध्ये पुरवण्यात आलेले अन्न निकृष्ट दर्जाचे होते तसेच पिण्याच्या पाण्याची चवही संशयास्पद होती, असा आरोप केला आहे. तक्रार करूनही रेल्वे कर्मचाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेतली नाही. आयुषी यांनी रांची येथील रुग्णालयातील वैद्यकीय अहवालही यासोबत शेअर केला असून, त्यात संसर्ग झाल्याचा उल्लेख असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी रेल्वे मंत्र्यांनाही टॅग करत प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला आहे. या आरोपांवर इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी) तातडीने खुलासा केला आहे.

# दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्तीत तबबल १२ वर्षानंतर वाढ

■ मुंबई

**राज्यातील** दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. तब्बल १२ वर्षांनंतर शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ होत असल्याने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील आठवी ते बारावी दरम्यान शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना होणार आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांना थेट आर्थिक मदत मिळणार आहे. राज्यातील आठवी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढ करण्यात आली असून, यामुळे त्यांच्या शिक्षणाला अधिक बळ मिळणार आहे.

# रशियाचे लष्करी विमान कोसळले

■ मॉस्को

**क्रिमियामध्ये** रशियन एएन-२६ लष्करी वाहतूक विमान कोसळून सहा कर्मचाऱ्यांसह २३ प्रवाशांचा मृत्यू झाला.



## २९ जणांचा मृत्यू

रशियन संरक्षण मंत्रालयाने आज पहाटे या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

संरक्षण मंत्रालयाच्या अहवालात विमानात किती लोक होते, हे सांगण्यात आले नसली तरी या अपघातात कोणी बचावल्याचा उल्लेखही नाही. एएन-२६ हे एक हलके सामरिक लष्करी वाहतूक विमान असून ते अनेक दशकांपासून लष्कराचा मुख्य आधार आहे. ते कमी व मध्यम अंतरावर माल आणि ४० प्रवाशांपर्यंत वाहून नेण्यास सक्षम आहे.

विमान एका उंच टेकडीवर आदळल्यामुळे हा अपघात झाला, असा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. रशियन संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी रात्री उशिरा सांगितले की, क्रिमियन द्वीपकल्पावरील नियोजित उड्डाणादरम्यान एएन-२६ विमानाशी संपर्क तुटला. हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला असून विमानावर शत्रूकडून कोणताही हल्ला झाला नाही.

# नव्या आर्थिक वर्षात रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ नाही

■ मुंबई

**महाराष्ट्र** सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय घेतला असून दर 'जैसे थे' म्हणजेच स्थिर ठेवले आहेत. आज १ एप्रिलपासून हेच जुनेदर २०२५-२६ चे म्हणून लागू राहतील.त्यामुळे घर खरेदीदार आणि बिल्डरांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

नवीन रेडी रेकनर दरात कोणतीही वाढ केलेली नाही,त्यामुळे मुद्रांक शुल्काचा अतिरिक्त बोजा पडणार नाही.हे दर आज १ एप्रिलपासून पुढील एक वर्षासाठी लागू राहतील. रिअल इस्टेट क्षेत्रातील मंदी आणि जागतिक अनिश्चितता लक्षात घेऊन सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मागील काही वर्षांत

**घर खरेदीदार आणि बिल्डरांना दिलासा!**

रेडी रेकनरच्या दरात सातत्याने चढ-उतार पाहायला मिळाली आहे.२०१७ -१८ मध्ये राज्यकारिता सरासरी ५.८६ टक्के वाढ झाली होती. २०२०-२१: कोरोना संकटामुळे केवळ १.७४ टक्के इतकी माफक वाढ केली होती.२०२३-२४ : ४.८१ टक्के वाढ झाली होती, जी पुढे दोन वर्षे कायम ठेवली गेली. २०२५-२६ (मागील वर्ष): मागील वर्षी ग्रामीण भागात ३.३६ टक्के नगरपालिका क्षेत्रात ४.९७ टक्के तर महापालिका क्षेत्रात ५.९५ टक्के वाढ करण्यात आली होती. तसेच मुंबई पालिका क्षेत्रासाठी ही वाढ ३.३८ टक्के होती. मात्र, २०२६-२७ साठी संपूर्ण राज्यात सर्व ठिकाणचे दर स्थिर ठेवण्यात आल्यामुळे सामान्यांच्या खिशाला अधिक कात्री लागणार नाही. दर स्थिर असले तरी, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी विभागाच्या महसुलात मात्र मोठी भर पडली आहे. २०२५ -२६ या आर्थिक वर्षात शासनाला एकूण ६९,५६८.९४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. यामध्ये सर्वाधिक वाटा 'आय-सरिता' प्रणालीचा असून त्याद्वारे ४९५३४ कोटींचा महसूल जमा झाला आहे.

# आम्हालाही गॅस सिलिंडर द्या मनसेची लोढांकडे मागणी

■ मुंबई

**मुंबईतील** मलबार हिल परिसरातील जैन मंदिरांना उत्सवासाठी गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्याच्या मागणीवरून वाद निर्माण झाला आहे. यावरून आज मनसेने गिरगावमध्ये आंदोलन करत हिंदू सणांसाठीही आम्हालाही गॅस सिलिंडर आणि समान सुविधा देण्याची मागणी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे केली.

मलबार हिलमधील १६ जैन मंदिरांना प्रत्येकी पाच व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्याची विनंती मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पत्राद्वारे केली होती. या पत्रावरून मनसे आक्रमक झाली आहे. मनसेचे विभागाध्यक्ष दिनेश पुंडे यांनी अशी मागणी केली की, ज्या पद्धतीने जैन समाजाला गॅस सिलिंडर दिले जात आहेत, त्याचप्रमाणे हिंदू सणांसाठीही गॅस उपलब्ध करून द्यावा. हनुमान जन्मोत्सव आणि समर्थ सप्ताहादरम्यान होणाऱ्या अन्नछत्रासाठी व्यावसायिक गॅस मिळावा. मनसे कार्यकर्ते मंत्री लोढा यांच्या निवासस्थानी निवेदन देण्यासाठी जात असताना पोलिसांनी त्यांना अडवून ताब्यात घेतले. जमावबंदीचे उल्लंघन होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई केल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मनसेने प्रशासनावर दबाव टाकल्याचा आरोप करत, जर राजकीय पक्षाचे पत्र नको असेल, तर आम्ही वैयक्तिकरित्या पत्र देऊ असे सांगितले.

# मुलुंडमध्ये रेल्वे रुळांवर हाणामारी

■ मुंबई

**व्हिडिओ व्हायरल**

**मध्य** रेल्वेच्या मुलुंड रेल्वे स्थानकावर दोन तरुणांमध्ये रुळांवरच हाणामारी झाल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे.

काही कारणावरून वाद झाल्याने दोन्ही तरुण आमनेसामने आले आणि वादाचे रूपांतर थेट मारामारीत झाले. विशेष म्हणजे ही झटापट थेट रेल्वे रुळांवरच सुरू होती, ज्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही प्रवाशांनी ट्रेन येत असल्याची सूचना देत दोघांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरीही काही काळ मारामारी सुरूच होती. अखेर एका प्रवाशाने धाडस दाखवत दोन्ही तरुणांना बाजूला करत ही हाणामारी थांबवण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे रेल्वे सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, हा व्हायरल व्हिडिओ लक्षात घेऊन रेल्वे पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. २ एप्रिल २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | आज वाटचाल फारशी सुकर असणार नाही. मात्र थोडे अधिक प्रयत्न यश देतील. नवीन संधी लाभतील. |
| वृषभ | प्रगतीच्या मार्गात अडथळे येतील. निर्धाराने सफलता मिळवता येईल. प्रवासात प्रतिकूल प्रसंग येतील. |
| मिथुन | प्राप्त गोष्टींचा स्वीकार करणे योग्य राहील. आर्थिक निर्णय लांबणीवर टाका. वरिष्ठांशी बेबनाव संभवतो. |
| कर्क | उद्दिष्टपूर्तीसाठी योग्य दिशेने प्रयत्न कराल. आर्थिक स्थैर्य लाभेल. कामाचे समाधान मिळेल. |
| सिंह | कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. संयमाने गोष्टी हाताळा. रागावर नियंत्रण ठेवा. |
| कन्या | दगदगीचा दिवस आहे. कामात चुका टाळा. सहकाऱ्यांबरोबर गैरसमज होण्याची शक्यता आहे. |
| तूळ | आज अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. पैसा जपून हाताळा. |
| वृश्चिक | निर्णय योग्य ठरतील. कठीण कामेही सहजगत्या पार पडतील. मित्रांचे पाठबळ लाभेल. पैशाचा ओघ वाढेल. |
| धनु | प्रसन्न करणाऱ्या घटना घडतील. बोलण्यातून अनेक लाभ होतील. पैशाचा ओघ मोठा राहील. |
| मकर | प्रगतीच्या मार्गात अडथळे येतील. नियोजनपूर्वक कामे करावी. ताण न घेता संयमपूर्वक वाटचाल महत्त्वाची ठरेल. |
| कुंभ | अनावश्यक चिंता त्रस्त करतील. आशावादी राहण्याने दिलासा लाभेल. कामात चुका टाळा. |
| मीन | लक्षणीय आर्थिक प्रगती होईल. बचतीत भर पडेल. मुत्सद्देगिरीची प्रशंसा होईल. |

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 13 • सोडत दिनांक 01/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **AK-01 : 3687**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी): **3687** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/-: **2909** — लकी लॉटरी - अहमदनगर; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2202 | 2652 | 2914 | 3273 | 3807 | 4339 | 6081 | 6485 | 6722 | 8679 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1429 | 1477 | 3405 | 3444 | 4410 | 4700 | 5295 | 8124 | 8790 | 9461 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1547 | 1700 | 1711 | 2307 | 2858 | 3592 | 4555 | 7764 | 9435 | 9933 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0625 | 1992 | 2115 | 2781 | 4027 | 4538 | 5484 | 8524 | 8944 | 9829 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0004 0012 0017 0019 0022 0023 0024 0025 0031 0032 0038 0039 0042 0056 0060 0068 0070 0100 0103 0118 0135 0160 0174 0180 0189 0194 0206 0233 0235 0252 0257 0277 0300 0306 0330
0391 0448 0466 0467 0478 0521 0525 0531 0544 0549 0572 0610 0620 0651 0676 0681 0690 0693 0705 0707 0710 0720 0734 0754 0775 0832 0845 0900 0919 1002 1013 1019 1020 1021 1039
1066 1101 1106 1113 1116 1118 1145 1155 1157 1186 1187 1211 1251 1296 1298 1301 1302 1319 1367 1379 1383 1404 1416 1435 1481 1490 1517 1518 1563 1570 1612 1615 1619 1642 1645 1687 1700 1741 1771 1791
1809 1812 1817 1872 1896 1926 1949 1954 1987 2012 2024 2029 2041 2078 2096 2123 2129 2150 2152 2159 2174 2214 2220 2222 2252 2253 2271 2279 2284 2289 2312 2321 2331 2338 2356 2359 2372 2402 2418 2423
2459 2460 2472 2502 2509 2519 2525 2542 2565 2577 2621 2626 2628 2641 2696 2712 2733 2745 2767 2771 2774 2775 2823 2848 2996 3031 3035 3048 3050 3075 3093 3137 3160 3182 3183 3199 3200 3223 3249 3312
3321 3339 3341 3343 3345 3353 3373 3389 3398 3423 3426 3433 3435 3436 3452 3459 3481 3535 3612 3703 3713 3725 3741 3750 3754 3773 3786 3822 3828 3858 3937 3941 3943 3948 3952 3957 4023 4035 4036 4069
4123 4145 4147 4164 4170 4173 4189 4191 4214 4220 4222 4228 4272 4292 4346 4349 4385 4400 4403 4404 4414 4420 4424 4427 4431 4433 4453 4454 4460 4465 4479 4481 4484 4486 4549 4552 4582 4589 4615 4619
4639 4640 4644 4669 4684 4743 4773 4777 4780 4799 4824 4847 4863 4885 4914 4929 4948 4973 4994 5024 5036 5047 5059 5060 5095 5105 5142 5184 5234 5249 5274 5386 5418 5445 5490 5503 5510 5512 5513 5518
5530 5548 5553 5557 5564 5577 5612 5627 5650 5689 5725 5789 5844 5858 5881 5901 5916 5942 5952 5991 6002 6025 6057 6063 6107 6123 6132 6143 6156 6160 6186 6226 6246 6316 6355 6474 6489 6546 6548 6565
6596 6606 6609 6642 6643 6650 6652 6654 6659 6661 6666 6677 6739 6755 6760 6767 6772 6801 6827 6851 6905 6920 6930 6940 6962 6967 6996 7003 7090 7097 7170 7180 7183 7204 7207 7245 7274 7281 7297 7341
7353 7377 7407 7425 7444 7472 7544 7548 7584 7607 7616 7624 7629 7638 7646 7658 7662 7675 7697 7700 7701 7721 7722 7728 7745 7750 7757 7765 7770 7774 7782 7783 7786 7794 7806 7813 7847 7873 7880 7916
7931 8004 8129 8146 8171 8188 8189 8204 8207 8212 8252 8298 8312 8343 8344 8353 8381 8387 8407 8451 8452 8468 8485 8486 8487 8489 8510 8562 8618 8622 8684 8687 8688 8709 8738 8764 8787 8796 8807 8816
8817 8818 8826 8838 8843 8851 8868 8871 8876 8880 8882 8883 8885 8888 8890 8895 8915 8922 8933 8948 9055 9083 9093 9094 9183 9187 9206 9243 9279 9293 9296 9319 9330 9349 9359 9381 9419 9439 9452 9468
9469 9473 9474 9497 9542 9568 9580 9598 9606 9608 9631 9642 9649 9667 9681 9691 9695 9697 9724 9743 9767 9769 9797 9809 9816 9820 9841 9861 9884 9891 9906 9907 9923 9930 9931 9935 9941 9942 9960 9988

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता.०२/४/२०२६

| | | |
|---|---|---|
| २ | ३ | ५ |
| २३ | ३४ | ५३ |
| २८ | ३९ | ५८ |
| २३७ | २४७ | १६८ |
| ६७९ | ३४६ | ३५७ |

# लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-: **MG-07 : 3695** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/-: **2252**

तिसरे बक्षिस रु. 2000/-: **9961**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2190 | 2256 | 2300 | 2631 | 5932 | 6142 | 6421 | 6692 | 6822 | 8954 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2089 | 5033 | 5850 | 8325 | 8536 | 8572 | 8574 | 8588 | 9319 | 9739 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0237 | 0259 | 3334 | 3641 | 3975 | 5805 | 6235 | 7738 | 9024 | 9274 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0103 0230 0287 0288 0386 0390 0571 0670 0724 0784 0809 0821 0975 1134 1136 1143 1144 1151
1172 1176 1211 1234 1254 1281 1414 1500 1516 1534 1557 1577 1617 1754 1765 1793 1811 1871
1988 1993 2027 2085 2179 2220 2222 2259 2262 2324 2358 2406 2478 2595 2692 2736 2760 2779 2813 2852 2921
2926 2956 2964 3040 3046 3084 3086 3110 3134 3236 3237 3256 3308 3355 3365 3372 3391 3410 3435 3593 3610
3613 3698 3714 3735 3826 4063 4133 4138 4142 4172 4188 4205 4214 4244 4247 4264 4305 4327 4380 4424 4472
4514 4515 4529 4535 4614 4643 4699 4714 4745 4798 4835 4844 4866 4946 4973 5038 5042 5047 5227 5308 5325
5358 5368 5415 5425 5446 5469 5519 5521 5550 5658 5956 6034 6163 6170 6229 6236 6260 6268 6286 6296 6305
6362 6389 6395 6443 6462 6506 6537 6566 6611 6629 6640 6672 6693 6699 6701 6768 6780 6796 6963 7032 7057
7170 7249 7255 7372 7416 7452 7512 7590 7713 7717 7719 7733 7787 7871 7904 7907 8018 8065 8181 8192 8228
8278 8382 8389 8392 8436 8457 8588 8666 8732 8763 8781 8788 8814 8838 8843 8853 8872 8874 8880 8892 8954
9049 9061 9091 9099 9129 9154 9192 9218 9228 9294 9297 9405 9425 9509 9569 9571 9709 9737 9778 9861 9938

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 01/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-: **SV-00 : 1424**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1400 | 1774 | 2209 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 3017 किशोर लॉटरी सेंटर,सांगली | 3884 प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स, कल्याण | 5141 | 8371 | 8568 | 9109 | 9351 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0708 | 2471 | 6096 | 6166 | 7592 | 8112 | 8494 | 8582 | 9215 | 9662 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1255 | 3119 | 3471 | 4829 | 5282 | 5288 | 6752 | 8609 | 9504 | 9866 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

0000 0100 0114 0200 0370 0440 0464 0505 0509 0540 0760
0928 0973 1281 1315 1347 1421 1658 1667 1854 1920 2220 2257 2270
2278 2287 2382 2572 2634 2700 2705 2863 2892 3024 3042 3213 3251
3266 3273 3338 3397 3421 3756 3935 4140 4250 4296 4303 4470 4474
4510 4538 4578 4634 4643 4644 4647 4747 4801 4925 4973 4977 5240
5254 5560 5635 5636 5825 5935 5986 6000 6178 6249 6416 6441 6569
6603 6902 6941 7187 7224 7287 7332 7347 7377 7460 7653 7748 7771
7797 7916 7975 8108 8168 8188 8403 8439 8528 8610 8637 8681 8748
8795 8860 8968 9016 9339 9402 9539 9554 9724 9731 9799 9853 9945

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# अंधेरीच्या सीप्झ परिसरातील केमिकल कंपनीत आग

■ मुंबई

**मुंबईतील** अंधेरी पूर्वेतील एमआयडीसी परिसरात आज सकाळी सीप्झ परिसरातील एका केमिकल कंपनीत आग लागल्याची घटना घडली. सकाळी सुमारे पावणेदहा वाजण्याच्या सुमारास कंपनीत अचानक आग लागली. आग लागल्यावेळी काही कर्मचारी आत अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार ते पाच गाड्या तसेच एमआयडीसी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन दलाने आग विझवण्याबरोबरच आत अडकलेल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी बचावकार्य हाती घेतले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. काचेची इमारत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूर संपूर्ण इमारतीत पसरला.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/-: **GL-02 : 8546**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0305 | 1225 | 2643 | 2991 | 5661 | 5707 | 6752 | 7158 | 8344 | 9529 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0936 | 3264 | 4622 | 4816 | 6449 | 6520 | 8050 | 8691 | 9106 | 9344 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0675 | 0845 | 1090 | 3436 | 4535 | 4957 | 5025 | 5559 | 6030 | 8069 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0609 | 0848 | 0958 | 1522 | 2317 | 3516 | 4211 | 7037 | 8632 | 8902 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0021 0040 0048 0064 0066 0075 0088 0097 0116 0150 0205 0206 0277 0300 0303 0318 0330 0359 0406 0482
0508 0525 0567 0570 0621 0645 0784 0813 0852 0888 0899 1011 1041 1054 1064 1110 1120 1133 1165 1220
1251 1267 1276 1299 1307 1398 1421 1435 1487 1515 1519 1531 1573 1629 1657 1834 1935 1941 1944 1984 2014 2044
2118 2171 2201 2272 2317 2398 2414 2415 2420 2477 2506 2562 2640 2644 2657 2669 2674 2681 2709 2773 2782 2824
2839 2907 2926 2971 2998 3035 3036 3039 3092 3208 3233 3262 3312 3319 3331 3335 3356 3363 3371 3384 3403 3483
3494 3539 3626 3650 3663 3728 3733 3779 3826 3832 3835 3837 4004 4020 4086 4106 4114 4134 4164 4176 4204 4394
4432 4435 4538 4608 4609 4648 4704 4718 4734 4774 4794 4809 4823 4877 4889 4968 5088 5104 5218 5319 5332 5366
5425 5456 5505 5564 5571 5595 5605 5645 5651 5822 5823 5843 5865 5964 6228 6267 6275 6287 6325 6336 6357 6423
6450 6476 6493 6600 6651 6660 6686 6736 6748 6880 7031 7091 7106 7108 7163 7175 7277 7311 7397 7417 7470 7481
7488 7567 7571 7605 7714 7716 7741 7765 7773 7780 7781 7790 7795 7852 7924 8004 8092 8165 8168 8268 8307 8348
8367 8443 8483 8523 8585 8587 8589 8681 8689 8692 8731 8782 8807 8824 8828 8871 8885 8904 8965 9061 9121 9129
9141 9242 9289 9295 9296 9319 9321 9347 9479 9499 9581 9618 9695 9738 9889 9890 9898 9909 9910 9919 9952 9988

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# महाराष्ट्र युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

■ मुंबई

**अखिल** भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी आज महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची नवी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. १२६ जणांच्या या कार्यकारिणीत खजिनदारपदी अनिकेत नवले व अक्षय जैन, संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार आणि प्रशासन सरचिटणीसपदी विवेक गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय तनवीर विद्रोही, प्रशांत ओगले, प्रथमेश अबनावे, कपिल ढोके, अनुराग भोयर, आमेर अब्दुल सलीम, दिप्तेश परब, आफरीन हुसेन यांची उपाध्यक्ष पदी तसेच ४४ सरचिटणीस आणि ७४ प्रदेश सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# ८ एप्रिलला ऑटोचा मोर्चा! ८०० रुपये शुल्काला विरोध

■ मुंबई

**राज्यातील** ऑटो रिक्षाचालकांच्या कल्याणकारी योजनेतील शुल्क संरचनेविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. ८ एप्रिल रोजी राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांवर (आरटीओ) मोर्चा काढण्याचा निर्णय विविध ऑटो संघटनांनी घेतला आहे.



या आंदोलनाचे मुख्य केंद्र मुंबईतील अंधेरी येथील आरटीओ कार्यालय असणार असून, मोठ्या संख्येने चालक येथे एकत्र येण्याची शक्यता आहे.या आंदोलनामागील मुख्य कारण म्हणजे ऑटो चालक कल्याणकारी मंडळाच्या योजनेत सहभागी होण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क. सध्या नोंदणीसाठी ५०० रुपये प्रवेश शुल्क आणि ३०० रुपये वार्षिक शुल्क, असे एकूण ८०० रुपये आकारले जात आहेत. या शुल्काला चालक संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

कामगारांच्या कल्याणासाठी स्थापन केलेल्या मंडळांमध्ये सहसा अत्यल्प शुल्क आकारले जाते. मात्र, ऑटो चालकांकडून ८०० रुपये आकारणे अन्यायकारक आहे अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे. ऑटो युनियनचे नेते शशांक राव यांनी सांगितले की, ऑटो चालकांवर आधीच परवाना, नूतनीकरण आणि इतर प्रक्रियांमुळे आर्थिक ताण आहे. अशा परिस्थितीत कल्याणाच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क लादणे योग्य नाही.

# निळजे ग्रामस्थांचे रेल्वेच्या विरोधातील आंदोलन स्थगित

**पर्यायी भुयारी मार्ग बांधण्याचे आश्वासन**

■ डोंबिवली

**येथील** निळजे गावातील रेल्वे फाटक अचानक बंद केल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे रेल्वेच्या या निर्णयाविरुद्ध निळजे ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले होते. परंतु रेल्वे प्रशासनाने पर्यायी भुयारी मार्गाचे लेखी आश्वासन दिल्यामुळे ग्रामस्थांनी हे आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून निळजे गावात येजा करण्यासाठी रेल्वे फाटक होते. परंतु हे फाटक रेल्वे प्रशासनाने अचानक बंद केले. त्यामुळे गावातील शाळकरी मुले,महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये अडचणी निर्माण झाल्या होत्या. रेल्वेच्या या निर्णयाविरोधात ग्रामस्थांनी अनेक आंदोलने केली होती. परंतु रेल्वेने काही ठोस निर्णय घेतला नव्हता. त्यामुळे या ग्रामस्थांनी आजूबाजूच्या २७ गावांच्या पाठिंब्याने बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले होते. परंतु खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार राजेश मोरे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली.

या बैठकीत ग्रामस्थांच्या मागणीनुसार रेल्वे अधिकाऱ्यांनी पर्यायी भुयारी मार्ग तयार करण्याचा तोडगा काढला. तसेच हे काम लवकरच सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले.

# साताऱ्यात मृतदेहांची अदलाबदल! डॉक्टर युवराज करपे निलंबित

■ सातारा

**साताऱ्याचे** जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे यांना राज्य शासनाने निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. मृतदेहांचे अदलाबदल प्रकरण त्यांना चांगलेच भोवले असून आरोग्य विभागाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली.

वाई तालुक्यातील सोनगरवाडी येथील २६ वर्षीय आनंद ओव्हाळ आणि आरळे येथील ५१ वर्षीय सुरेश खोमणे या दोघांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाने दोन्ही नातेवाईकांना चेहरा न दाखवता मृतदेह ताब्यात दिले.



सातारा जिल्हा रुग्णालयात एकाच महिन्यात दोनदा मृतदेहांची अदलाबदल झाल्याने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवून आरोग्य विभागाने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृतदेहांची थेट अदलाबदल झाली. इतकेच नव्हे, तर एका कुटुंबाने चुकीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. चिता पेटल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पेटती चिता विझवण्याची वेळ नातेवाईकांवर आली. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या निलंबनाच्या कारवाईवरच राज्य सरकार थांबणार नसून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन डॉ. करपे यांची विभागीय चौकशी देखील होणार आहे.

# राज्यातील ५४ प्रदूषित नद्यांचे पुनरुज्जीवन होणार

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज महाराष्ट्रातील प्रदूषित नद्यांच्या पुनरुज्जीवनासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या या निर्णयानुसार, राज्यातील ५४ प्रदूषित नदीपट्ट्यांच्या पुनरुज्जीवनासाठी विविध प्रकल्प राबवले जाणार आहेत. या उपक्रमामुळे नदी स्वच्छता, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनाला चालना मिळणार आहे. तसेच राज्यातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी या प्राधिकरणाच्या माध्यमातून विशेष प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत.

# नराधमाला फाशी द्या! मुलाच्या वडिलांची मागणी

■ वसई

**४ वर्षाच्या** चिमुकल्या मुलाला जमिनीवर आपटून अमानुष मारहाण करणाऱ्या विकृत संदीप पवार याला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी मुलाचे वडील अतुल कोंडारे यांनी केली आहे. या मारहाणीत जखमी झालेला विघ्नेश रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार घेत असून त्याची प्रकृती अद्याप चिंताजनक आहे.

सोमवारी संध्याकाळी वसईच्या अनुपम घर संकुल या इमारतीत ही घटना घडली होती. या इमारतीत राहणाऱ्या संदीप पवार (५७) या रिक्षाचालकाने इमारतीच्या आवारात खेळत असलेल्या ४ वर्षांच्या विघ्नेश कोंडारे या मुलाला उचलून जमिनीवर आपटले आणि अमानुष मारहाण केली होती. या घटनेची चित्रफित पाहून संताप पसरला होता. विघ्नेशवर मिरा रोडच्या वोक्हार्ट रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुरूवारी त्याची एमआरआय चाचणी करण्यात आली. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील शस्त्रक्रिया करण्याबाबत ठरवले जाईल, असे डॉक्टरांनी सांगितले.

विघ्नेशचे वडील अतुल कोंडारे (३७) यांचा बांधकामाचा व्यवसाय होता. काही वर्षांपूर्वी संदीप पवार याच्याबरोबर कामावरून आर्थिक वाद झाला होता, असे त्यांनी सांगितले. माझ्याशी असलेल्या वादाचा राग त्याने माझ्या मुलावर अशाप्रकारे काढला. त्याला फाशीची शिक्षा द्या अशी मागणी कोंडारे यांनी केली.

# भूकर मापक पदाऐवजी परीरक्षण भूमापक पद

■ मुंबई

**मंत्रिमंडळ निर्णय**

**राज्य** मंत्रिमंडळाची झालेल्या बैठकीत आज महसूल विभागाने भूकर मापक पदाऐवजी परीरक्षण भूमापक हे नवीन पद निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. हे पद पदोन्नती तसेच विभागीय भरतीद्वारे भरण्यात येणार असून, यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुल उभारण्यासाठी मौजे नवसारी येथील १६,७०८ चौरस मीटर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे याबाबत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महसूल खात्यामार्फत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुल उभारण्यासाठी नवसारी येथील सर्व्हे नंबर २९ मधील १६,७०८ चौरस मीटर जागा विनाशुल्क देण्यात आली आहे. तसेच या जागेसाठी महानगरपालिकेला भरावे लागणारे सुमारे १४ कोटी रुपये माफ करण्यात आले असून, ही जागा क्रीडा संकुलासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे भूमी अभिलेख विभागातील सेटलमेंट कमिशनर कार्यालयातील भूकर मापक (सर्व्हेयर) यांच्या वेतनगटाबाबत आहे. सध्या त्यांचा वेतनगट एस-६ होता. आता पुढील तीन वर्षात ही श्रेणी बंद करून सर्वांना एस-८ वेतनगटात समाविष्ट करण्यात येणार आहे. २००३ पासून भूकर मापकांची एस-८ वेतनगटाची मागणी प्रलंबित होती, ती आता पूर्ण करण्यात आली आहे.

# तीर्थक्षेत्र श्री यमाईदेवी मंदिरात यात्रा व हनुमान जयंती उत्सव

■ कवठे येमाई

**महाराष्ट्रातील** तमाम भाविक भक्तांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेले शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावाचे ग्रामदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र श्री येमाईदेवीची यात्रा व हनुमान जयंती उत्सव गुरुवार २ व ३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीने दिली आहे.

हा यात्रोत्सव व वीर हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय यात्रोत्सव सोहळ्यानिमित्त गावात विविध धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# अकोलात पोलीस अधिकाऱ्याची महिलेकडे शरीरसुखाची मागणी

■ अकोला

**अकोलात** पोलीस कोठडीत असलेल्या एका महिला आरोपीकडे कर्तव्यावर असलेल्या सहायक पोलीस उपनिरीक्षकाने मुलीला शरीरसुखासाठी पाठवण्याची मागणी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या अकोलातील एका महिलेला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली होती. त्यानुसार तिला सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात ठेवण्यात आले होते. याच दरम्यान, कर्तव्यावर असलेल्या सहायक पोलीस उपनिरीक्षकाने संबंधित महिलेला, तुझ्या मुलीला शरीरसुखासाठी पाठव, तुला १० हजार रुपये देतो, असे आमिष दाखवल्याचा आरोप आहे. या

**सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

प्रकारानंतर संबंधित महिलेने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत वरिष्ठांनी तत्काळ चौकशी सुरू केली. प्राथमिक तपासात आरोप गंभीर असल्याचे समोर आल्यानंतर संबंधित सहायक पोलीस उपनिरीक्षकाला निलंबित करण्यात आले असून त्याच्याविरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणाची एक चित्रफितही समाजमाध्यमांवर व्हायरल झाली असून त्यामध्ये वरिष्ठ अधिकारी संबंधित पोलिसाला जाब विचारताना दिसत आहेत. वर्दीची लाज बाळगली नाही का? अशा शब्दांत त्याला फटकारण्यात आल्याचे या व्हिडिओत दिसत आहे. या घटनेमुळे अकोलासह संपूर्ण राज्यात संताप व्यक्त होत असून पोलीस कोठडीतही महिलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात! तिघांचा मृत्यू

■ धुळे

**मुंबई-आग्रा** महामार्गावर धुळे जिल्ह्यात एका डंपरने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील तिघे रस्त्यावर फेकले गेले आणि डंपरच्या चाकाखाली चिरडले गेले. गंभीर जखमी झालेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेमुळे काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी जाऊन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. तिन्ही मृतांची ओळख पटली असून डंपर चालकासह वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालय, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'RuPay On-The-Go' एनसीएमसी सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचे लोकार्पण केले. या योजनेअंतर्गत प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल व पारदर्शक होणार आहे. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार, मंत्री प्रताप सरनाईक व मंत्रिमंडळातील इतर सदस्य उपस्थित होते.

# ऋषिकेश वैद्यची मागील वर्षीच पीडित महिला, पतीला धमकी

■ वसई

**बलात्कार** प्रकरणात पुणे पोलिसांच्या कोठडीत असलेल्या वसईतील भोंदू बाबा ऋषिकेश वैद्य याने मागील वर्षी पीडितेला धमकावल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी वैद्य विरोधात वसई पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल आहे. यामुळे पीडित महिलेची बाजू अधिक भक्कम झाल्याचे मानण्यात येत आहे.

वसईतील स्वयंघोषित वैद्य ऋषिकेश वैद्य याने पुण्यातील ३५ वर्षीय महिलेवर अध्यात्माच्या नावाखाली जवळीक साधून २०२३ मध्ये पुण्यात बलात्कार केला होता. याप्रकरणी तो पोलीस कोठडीत असून त्याची चौकशी सुरू आहे. बलात्कार केल्यानंतर वैद्य पीडित महिलेला अश्लील छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल करत वारंवार तिला भेटायला बोलवत होता. ही बाब पीडित महिलेच्या पतीला समजल्यानंतर २९ ऑक्टोबर २०२५ रोजी त्याने वैद्यच्या वसई येथील बंगल्यात येऊन जाब विचारला होता. मात्र हा प्रकार उघडकीस आणलास तर मी तुझ्या मुलाला आणि तुला ठार मारेन, अशी धमकी दिली होती.

# गणपतीपुळेत भाविकांसाठी मोफत नाश्त्याची खास सुविधा

**रत्नागिरी** - गणपतीपुळे देवस्थानने भाविकांच्या सोयीसाठी सकाळी ८ ते १० या वेळेत मोफत नाश्त्याची व्यवस्था सुरू केली आहे. गॅस पुरवठ्यातील तुटवड्यामुळे पर्यटक आणि भाविकांची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने मंदिर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. आखाती भागातील युद्धजन्य परिस्थितीमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे मंदिर परिसरातील अनेक हॉटेल चालकांनी सेवा देण्यास असमर्थता दर्शवली आहे. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी देवस्थानने पुढाकार घेत मोफत नाश्त्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या निर्णयाचे भाविकांकडून स्वागत होत आहे. देवस्थानतर्फे महाप्रसादाच्या दुपारच्या आणि संध्याकाळच्या वेळेतही वाढ करण्यात आली आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये, ही आमची प्राथमिकता आहे असे देवस्थान प्रशासनाने स्पष्ट केले.

# म्हाडाच्या भाडेतत्त्वावरील घरांचे धोरण शासनाच्या लालफितीत




■ मुंबई

**म्हाडाच्या** भाडेतत्त्वावरील घरांचे धोरणाचा मसुदा राज्य शासनाच्या लालफिती कारभारात गेल्या तीन महिन्यांपासून अडकून पडला आहे. या धोरणाला यावर्षी तरी मंजुरी मिळेल का? असा सवाल होऊ लागला आहे.

मुंबईत व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम व व्यवसायानिमित्त येणाऱ्या नागरिकांना म्हाडाच्या माध्यमातून खासगी घरे भाडेतत्त्वावर घेता यावीत यासाठी नोडल एजन्सी म्हणून म्हाडा पोर्टल तयार करून काम पाहणार आहे. याबाबत शासनाने धोरण तयार करण्याची जबाबदारी म्हाडावर सोपविली होती. यासाठी वारंवार स्मरणपत्रे पाठवून विचारणा केली जात होती, असे सांगून म्हाडातील एक अधिकारी पुढे म्हणाला, आम्ही भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणाचा मसुदा तयार करून ३१ डिसेंबर २०२५ मध्ये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. यात काही त्रुटी असल्यास शासनाने फेरबदल करून निर्णय घेणे अपेक्षित आहे. मात्र धोरणावर तीन महिने झाले. अद्याप निर्णय घेतला जात नाही, अशी नाराजी म्हाडातून होत आहे.

# नाईट क्लब आग प्रकरणात लुथ्रा बंधूंना जामीन मंजूर

■ पणजी

**डिसेंबर** २०२५मध्ये अर्पोरा येथे 'बर्च बाय रोमिओ लेन' नाईट क्लबला लागलेल्या आगच्या प्रकरणी क्लबचे मालक सौरभ आणि गौरव लुथ्रा या दोघांना आज उत्तर गोव्यातील सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

न्यायालयाने दोघांना प्रत्येकी ५०,००० रुपयांच्या जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. तसेच त्यांनी साक्षीदार किंवा पुराव्यांमध्ये हस्तक्षेप करू नये आणि न्यायालयाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय देशाबाहेर जाऊ नये, असेही निर्देश दिले. हा खटला ६ डिसेंबर २०२५ च्या रात्री उत्तर गोव्यातील अर्पोरा येथील 'बर्च बाय रोमिओ लेन' नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीशी संबंधित आहे. या दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. आग लागल्यानंतर काही तासांतच लुथ्रा बंधू थायलंडला पळून गेले होते. नंतर त्यांना भारतात परत पाठवण्यात आले आणि गोवा पोलिसांनी त्यांना अटक केली. लुथ्रा बंधूंवर इतर भागीदार, क्लब मॅनेजर, कार्यक्रम आयोजक आणि कर्मचाऱ्यांसह भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये खुनासमान नसलेला मनुष्यवध, जीवितास धोका निर्माण करणारे कृत्य आणि आगीसंदर्भातील निष्काळजीपणा अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, संबंधित नाईट क्लब आवश्यक परवाने आणि सुरक्षा मंजुरीशिवाय चालवला जात होता. तसेच, तेथे आयोजित करण्यात आलेल्या फायर शोदरम्यान पुरेशी सुरक्षा उपाययोजना न केल्याने ही आग लागल्याचा आरोप आहे.

# कल्याण-डोंबिवलीत बेकायदा बांधकामांवर पालिकेचा हातोडा

■ कल्याण

**कल्याण-डोंबिवली** महापालिका हद्दीतील २७ गावांपैकी सोनारपाडा येथील शिवशक्ती नगर परिसरात उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळींवर पालिकेने मोठी कारवाई करत त्या जमीनदोस्त केल्या.

मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर आणि रहिवाशांच्या ये-जा मार्गात अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने भूमाफियांनी कोणतीही बांधकाम परवानगी न घेता या चाळी उभारल्या होत्या. या चाळी गेल्या काही दिवसांत रात्रंदिवस काम करून उभारण्यात आल्या होत्या. नव्याने बांधलेल्या या संरचनांना प्लास्टर करून त्या तत्काळ राहण्यायोग्य बनवण्यात आले होते. तसेच कारवाई टाळण्यासाठी या खोल्यांची विक्री करण्याची तयारीही सुरू होती. सोनारपाडा परिसरातील नागरिकांनी या बेकायदा बांधकामांविरोधात पालिका आयुक्त आणि आय प्रभागाचे सहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून बांधकाम बेकायदा असल्याची खात्री केली.

पावसाळ्यातील पाण्याचा नैसर्गिक निचरा अडवून ही बांधकामे करण्यात आल्याचेही पाहणीत उघड झाले. यानंतर आय प्रभागाच्या पथकाने तातडीने कारवाई करत या सर्व चाळी जमीनदोस्त केल्या.

# एआयमुळे नोकरी गेल्याने इंजिनिअरने जीवन संपवले

■ बंगळुरू

**उत्तर** भागातील कोथानूर परिसरात सॉफ्टवेअर इंजिनिअर भानू चंदर रेड्डी (३२) आणि बिबी शाझिया सिराज या दाम्पत्याने आत्महत्या केली. अमेरिकेतील नोकरी गमावल्यामुळे आलेल्या नैराश्यातून भानू रेड्डी यांनी गळफास घेऊन जीवन संपवल्यानंतर, अवघ्या २० मिनिटांत त्यांच्या पत्नी बिबी शाझिया सिराज यांनीही इमारतीच्या १८व्या मजल्यावरून उडी मारून आयुष्य संपवले.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भानू रेड्डी हे गेली अनेक वर्षे अमेरिका येथे नोकरी करत होते. मात्र, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'मुळे आयटी क्षेत्रात झालेल्या कर्मचारी कपातीचा फटका त्यांनाही बसला आणि त्यांची नोकरी गेली. त्यानंतर भारतात परतल्यानंतर ते नोकरीच्या शोधात होते.

**पत्नीचीही आत्महत्या**

बेरोजगारी, आर्थिक अडचणी, आरोग्य समस्या आणि मानसिक ताण यामुळे ते नैराश्यात होते. भानू आणि शाझियाने दोन वर्षांपूर्वी प्रेमविवाह केला होता. आठ महिन्यांपूर्वी शाझियाला बंगळुरूमध्ये नोकरी मिळाल्यानंतर ते येथे स्थायिक झाले होते. दरम्यान, शाझिया काल हैदराबाद येथून बंगळुरूला परतली होती. सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास तिने घराचा दरवाजा ठोठावला, मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. वारंवार फोन करूनही भानू प्रतिसाद देत नसल्याने तिने सुरक्षारक्षकांना बोलावले. दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यावर भानू गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. पतीचा मृतदेह पाहून शाझियाला मोठा धक्का बसला. पोलीस घटनास्थळी तपास करत असतानाच शाझियाने इमारतीचा १८वा मजला गाठून खाली उडी मारली. यात तिचा जागीच मृत्यू झाला.

# विश्वशांतीसाठी मुंबादेवी मंदिरात ४ एप्रिलला विष्णू यागचे आयोजन

■ मुंबई

**अमेरिका** आणि इराण यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर विश्वशांती आणि जनकल्याणासाठी मुंबईतील श्री मुंबादेवी मंदिर विश्वस्त निधीतर्फे विशेष धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री विष्णू यागचे आयोजन शनिवार, ४ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मुंबादेवी मंदिर परिसरात करण्यात येणार आहे.

सध्याच्या जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र शांतता प्रस्थापित व्हावी आणि नागरिकांचे कल्याण व्हावे, या उद्देशाने हा याग आयोजित करण्यात आल्याचे विश्वस्तांनी सांगितले.या विशेष धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर विश्वस्त निधीतर्फे करण्यात आले आहे.

# एससी आरक्षण उपवर्गीकरण उच्चस्तरीय समिती स्थापन

**मुंबई** - राज्य सरकारने अनुसूचित जाती (एससी) आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सामाजिक न्याय विभागाच्या बैठकीत या विषयावर आलेल्या निवेदनांवर विचार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुसूचित जातीच्या आरक्षणांतर्गत उपवर्गीकरण करण्यासंदर्भात प्राप्त झालेले अर्ज आणि निवेदनांची सखोल छाननी करण्याचे काम ही समिती करणार आहे.

प्रिंटिंग रोजगार मित्र

आमच्या द्वारे प्रिंटिंग, पॅकेजिंग आणि संबंधित उद्योगातील नोकरीच्या संधींची माहिती मिळवा/माहिती द्या

आमच्यासोबत जुडण्यासाठी आजच संपर्क करा किंवा QR Code स्कॅन करा: 8976394376/9167759484
ईमेल: printingrojgarmitr@gmail.com

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# वायुपुत्र हनुमान रामभक्तीचा प्राण

*लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा, पुरातना,*
*पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषिका,*

अशा शब्दात समर्थ रामदासांनी हनुमानाची अर्थात मारूतीरायाची स्तुती केली आहे. आज देशभर हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. गेल्या काही वर्षात भारतामध्ये रामभक्तीची एक मोठी लाट आल्याचे चित्र पाहायला मिळते. राम मंदिराच्या आंदोलनापासून ते राममंदिराच्या निर्माणापर्यंत असा जवळपास तीस चाळीस वर्षाचा कालावधी रामभक्तीने ओतप्रोत भरल्यासारखे वातावरण निर्माण झाले होते. सर्वगुणसंपन्न राम आणि म्हणून त्याची तितक्याच प्रकर्षाने केली जाणारी भक्ती ही जितकी महत्त्वाची आहे तितकीच रामाचा अनन्यभक्त असलेल्या हनुमानाचीही भक्ती आवश्यक ठरते. अजूनही अनेकांचा यावर विश्वास बसत नाही की हनुमान तरी रामाचा दास असला तरी राम स्वतः हनुमानाचे भक्त होते. खरे तर आपल्या महाराष्ट्रातल्या अनेक संतांनी परमेश्वराच्या भक्तीची महती सांगताना हे बऱ्याच अभंगांमधून स्पष्ट केले आहे की ईश्वर हा भक्ताधीन असतो. जे लोक अखंड साधना करतात भक्ती करतात, नामस्मरण करतात किंवा ज्यांना प्रपंच करता करता परमेश्वरच अधिक महत्त्वाचा वाटत असतो.आपल्या प्रपंच किंवा व्यवसायाचा सगळा भार परमेश्वरावर टाकतात. आपण करीत असलेल्या प्रयत्नांना यश द्यायचे की नाही याचा निर्णय ते भगवंतावर सोडून देतात. प्रयत्नांमध्ये कोणतीही कसर सोडत नाहीत. परंतु ईश्वराच्या स्मरणाने केलेले कार्य हे कधीही वाया जात नाही. हा भारतीय संस्कृतीतल्या ऋषीमुनींपासून ते आताच्या संतमहात्म्यांपर्यंत अनेकांचा अनुभव आहे. म्हणूनच ज्यावेळेला भक्ती कशी करावी याची उदाहरणं दिली जातात. त्यावेळेला ती हनुमानासारखी असावी असेच एकमेव उत्तर देता येते. या भक्तीचे मर्म आणि रहस्य म्हणजेच हनुमंत आहे. ज्याच्याकडे सर्व प्रकारची शक्ती होती. बुद्धिमत्ता होती. म्हणजेच सर्वगुण आणि शक्तीसंपन्न असूनही ज्या हनुमंताने रामाच्या चरणी पूर्ण लोटांगण घातले होते. रामाशिवाय त्याच्या मनात किंवा ह्दयात कुठलाही विचार नसायचा.

**रामाला हनुमान प्रिय**

प्रभूरामालाही हनुमंत हाच सर्वाधिक लोकप्रिय भक्त वाटत होता. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सर्व प्रकारची गुणवत्ता, पात्रता असतानाही कोणत्याही प्रकारचा गर्व किंवा अहंकार हनुमानाकडे नव्हता. प्रत्यक्ष प्रभुरामाचे पूर्ण अभय किंवा वरदान त्याला प्राप्त झाले होते आणि स्वतःमध्येसुद्धा बुद्धी आणि शक्तीचे तितकेच मोठे सामर्थ्य होते. परंतु त्याचा गैरवापर हनुमंताने केला नाही. उलट जिथे जिथे आवश्यकता असेल तिथे तिथे अत्यंत नम्रतेने हनुमंताने रामाची सेवा केली. एवढेच नव्हे तर अडीअडचणीच्या काळात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रभूरामांनी हनुमंताला सल्ले विचारले होते. वाल्मिकी रामायणाच्या किश्किंधा कांडामध्ये हनुमानच्या जन्माचा उल्लेख येतो. मुळातच वायुपुत्र किंवा पवनपुत्र असलेला हनुमान म्हणजेच अनेकबाबतीत तो वेगवान होता. वायू हा प्राणासमान मानला जातो आणि म्हणूनच हा वायुपुत्र हनुमानसुद्धा रामभक्तीचाच प्राण मानला गेला. स्वतःकडे थोडी जरी विद्वत्ता शक्ती, आर्थिक सुबत्ता, सत्ता किंवा अधिकार जरी आला तरी मनुष्य त्याचा गर्व करायला लागतो. इतरांना तुच्छ लेखण्याची मनोवृत्ती आकाराला येते. परंतु हनुमानाच्या गुणसंपदेमध्ये सर्व प्रकारच्या शक्ती असूनदेखील हनुमान किती नम्रपणे वागत होता हे जर लक्षात घेतले , मुळातच नम्र असलेल्या रामालासुद्धा हनुमान प्रिय होणे तितकेच स्वाभाविक ठरते. अशीही एक कथा सांगितली जाते की सीता अपहरणाच्या काळात ज्यावेळी वानरसेना सेतू बांधण्याचे काम करत होती त्यावेळी छोटीशी खार समुद्रात ओली होऊन यायची किनाऱ्यावर येऊन आपल्या अंगाला वाळू चिकटवायची आणि ती वाळू समुद्रात टाकून यायची ही बाब हनुमानाच्या लक्षात येते. तो रामाला सांगतो. ही खारूताई आपल्याला सेतू बांधायला मदत करते आहे. राम म्हणतात तिला बोलवून आण, हनुमान बोलवायला जातो. ती म्हणते मला वेळ नाही भरपूर कामे आहेत. परंतु हनुमान तिला रामाकडे घेऊन येतो. राम तिच्या पाठीवरून हात फिरवतो आणि तेच खारीच्या पाठीवर उमटलेली रामाची बोटं आहेत असे सांगितले जाते. परंतु इतक्या शक्तीमान हनुमानाचे अत्यंत छोट्या अशा खारूताईकडे लक्ष जाणे आणि तिच्या प्रयत्नांचे त्याने कौतुक करणे यामध्येच भक्त होण्यासाठी अशा प्रकारची नम्रता आणि छोट्यातल्या छोट्या गोष्टींचे महत्त्व ओळखण्याची बुद्धी असावी लागते.

**समर्थांची हनुमान भक्ती**

आज हनुमान जयंतीचा उत्सव साजरा करीत असताना हनुमानाची रामभक्ती ही शक्तीसंपन्नता असूनही नम्रता शिकवणारी ठरते. किंबहुना त्याच हनुमंताच्या आराधनेतून बलसंपन्नता आणि बुद्धीसंपन्नताही एकाचवेळी प्राप्त करता येते. म्हणूनच समर्थ रामदासांनी रामाची भक्ती करीत असताना हनुमंताचा आदर्श स्वतःसमोर ठेवला होता. म्हणूनच त्याला त्यांनी लोकनाथा , जगन्नाथा, प्राणनाथा, पुरातना अशा प्रकारची सार्थ बिरूदावली त्याच्याविषयी व्यक्त केली होती. समाजाला रामाची भक्ती करायची असेल तर बुद्धीसंपन्न आणि बलसंपन्न व्हावे लागेल यासाठीच त्यांनी महाराष्ट्रात अकरा मारूतींची स्थापना केली होती. समर्थ रामदासांचा जन्मदेखील रामनवमीच्याच दिवशी झाला होता. आणि अशा एक रामभक्ताने हनुमंताची आराधना करून भगवंताचे दास होऊनच राहिले पाहिजे अशा प्रकारचा कायमस्वरूपी संस्कार आपणा सर्वांना दिलेला आहे. आजच्या काळात हनुमंताचा आदर्श ठेवूनच कोणत्याही प्रकारची भक्ती करता आली पाहिजे. अहंकार गर्व न बाळगता आणि लहानातल्या लहान गोष्टींकडे तितक्याच सहजतेने पाहाण्याची सवय लावून घेतली पाहिजे. खरे तर ज्यांना रामाचे जीवन समजून घ्यायचे आहे त्यांनी सर्वप्रथम हनुमान समजून घेतला पाहिजे. त्याच्यातली गुणवत्ता, बुद्धीमत्ता आचरणात आणता आली तर भक्तीसंपन्नता आपोआप प्राप्त होऊ शकते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जेवढ्या जास्त समस्या निर्माण होत असतात,
त्यापेक्षा कित्येक पटीने नवीन पर्याय तयार होत असतात.

## पंचांग

**गुरुवार २ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



**रवी उदय- ०६-३३,**
**रवी अस्त- १८-५२**

*** चैत्र पौर्णिमा**
**नक्षत्र - हस्त**

**जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-००- कन्या**

**श्री हनुमान जयंती, वैशाख स्नानारंभ, श्री महालक्ष्मी रथोत्सव- कोल्हापूर, पौर्णिमा समाप्ती स. ७.४१, ऑटिझम जागरुकता दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




## मिक्स व्हेज पराठा



★ **साहित्य:** २ वाट्या कणिक, २ कांदे, १ बटाटा, १ वाटी किसलेली फुलकोबी, १ वाटी पनीरचे तुकडे, २ ते ३ हिरव्या मिरच्यांची पेस्ट, १ टीस्पून आल्याची पेस्ट, गरम मसाला, हळद, चाट मसाला, जीरेपूड प्रत्येकी एकेक टीस्पून, २ टेबलस्पून बारीक चिरलेली कोथिंबीर, चवीनुसार मीठ

★ **कृती:** एका भांड्यामध्ये कणिक घ्या आणि थोडंसं तेल, मीठ घालून ती थोडी घट्ट मळून घ्या. यानंतर १० मिनिटांसाठी ती झाकून ठेवा. यानंतर एक फुलकोबी स्वच्छ धुवून ती किसून घ्या. बटाटे उकडून मॅश करून घ्या. कांदा आणि कोथिंबीर अगदी बारीक चिरून घ्या. आता एका मोठ्या भांड्यामध्ये किसलेली फुलकोबी, उकडलेले बटाटे, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर, मिरच्या आणि आल्याची पेस्ट, पनीर घालून घ्या. त्यामध्येच गरम मसाला, जिरेपूड घाला. सगळे पदार्थ व्यवस्थित एकजीव करून घ्या. मीठ आणि चाट मसाला सगळ्यात शेवटी घालावा. कारण ते जर आधी घातले तर भाज्यांना पाणी सुटते. यानंतर भिजवलेल्या कणकेचे छोटे छोटे गोळे करून ठेवा. त्यानंतर भाज्यांच्या मिश्रणात चाट मसाला आणि मीठ घाला. आता आलू पराठे लाटतो त्याप्रमाणे कणकेच्या गोळ्यांमध्ये भाज्यांचे सारण भरून पराठे लाटून खमंग भाजून घ्या.



## क्रीडा

# दिल्ली कॅपिटल्सचा लखनौवर ६ विकेटने विजय

## रिझवीची नाबाद ७० धावांची दमदार खेळी

**लखनौच्या एकना क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ५ व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने लखनौ सुपर जायंट्सवर ६ विकेटने विजय मिळवून स्पर्धेतील सुरुवात गोड केली. वेगवान गोलंदाज नटराजन (३ गडी) आणि लुंगीसह (३ गडी) दिल्लीच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करून लखनौला १८.४ षटकांत सर्वबाद १४१ धावांवर रोखले. मात्र लखनौच्या गोलंदाजांनीही आपली चमक दाखवून दिल्लीचे ४ विकेट २४ धावांवर बाद केले. मात्र दिल्लीचा संकटात सापडलेला डाव समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्सने सावरून संघाला विजयी आकडा १७.१ षटकांत गाठून दिले. रिझवीने नाबाद ७० आणि स्टब्सने नाबाद ३९ धावा केल्या.**



■ लखनौ

**दिल्लीचा** कर्णधार अक्षर पटेलने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अक्षरचा हा निर्णय दिल्लीच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. लखनौची धावसंख्या २.५ षटकांत १९ वर पोहोचताच मुकेश कुमारने टाकलेला चेंडू मिशेल मार्शने सरळ फटकावला. तो मुकेशच्या हाताला लागून स्टंपला लागला.

नॉन स्ट्राईकवर असलेला ऋषभ पंत क्रीजच्या बाहेर राहिल्याने तो धावचित झाला. त्यानंतर एडन मार्करामने अक्षरच्या ५ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूंवर खणखणीत षटकार ठोकला. मात्र अक्षरने या षटकाच्या पाचव्या चेंडूवर मार्करामचा त्रिफळा उडवला. आयुष बडोनीला ० धावेवर नटराजनने माघारी पाठवले. त्यापाठोपाठ गोलंदाज लुंगीने आक्रमक फलंदाज निकोलस पूरनला तंबूत धाडले. त्याने फक्त ८ धावा केल्या. त्यामुळे एकामागून एक फलंदाज बाद झाल्याने लखनौचा डाव अडचणीत आला. त्यात सेट झालेला सलामीवीर फलंदाज मिचेल मार्शही कुलदीप यादवच्या ९ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या नादात झेलबाद झाला. त्यामुळे लखनौचा पाय आणखी खोलात गेला. अब्दुल समद आणि मुकुल चौधरी यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र ही जोडी कुलदीप यादवने फोडली. मुकुल फक्त ११ चेंडूंत १४ धावा करुन बाद झाला. मग फलंदाज शिल्लक न राहिल्यामुळे संघाने शहबाज अहमदला 'इम्पॅक्ट प्लेयर' म्हणून मैदानात उतरवले. शहबाज अहमदची साथ देऊन अब्दुल समदने चांगले फटके मारून संघाची धावगती काहीसी वाढवली. लखनौची धावसंख्या १७.२ षटकांत ६ बाद १३८ वर पोहोचताच नटराजनने अब्दुल समदला बाद केले. अब्दुलने २५ चेंडूंत ३६ धावा ठोकल्या. मोहम्मद शमी १, ॲनरिच नॉर्टजे ०, मोहसिन खान ४ धावा करून झटपट बाद झाले. शहबाज अहमद १५ धावांवर नाबाद राहिल्यामुळे लखनौने १८.४ षटकांत सर्वबाद १४१ धावा केल्या. दिल्ली कॅपिटल्सकडून अक्षर पटेलने १ विकेट घेतली. तसेच टी. नटराजनने आणि लुंगी एनगिडीने प्रत्येकी ३-३ विकेट घेतल्या. तर फिरकीपटू कुलदीप यादवने २ गडी बाद केले.

१४१ धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात अतिशय खराब झाली. लखनौचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या पहिल्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर दिल्लीच्या सलामीवीर फलंदाज के. एल. राहूल (०) झेलबाद झाला. मग मोहसिन खानच्या तिसऱ्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर नितीश राणा (१५) झेलबाद झाला. दिल्लीने 'इम्पॅक्ट प्लेयर' म्हणून समीर रिझवीला फलंदाजीसाठी उतरवले. मग राजकुमार यादवच्या चौथ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर पाथुम निस्संका मोठा फटका मारताना यष्टीरक्षकाकडे झेलबाद झाला. त्याने ५ चेंडूंत १ धाव केली. या षटकाच्याच चौथ्या चेंडूवर अक्षर पटेलचा (०) त्रिफळा उडवला. दिल्लीचे ४ फलंदाज ४.३ षटकांत २४ धावांवर बाद झाल्यामुळे या सामन्यात मोठी रंगत आली. संकटात असलेल्या दिल्लीचा डाव समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्स या जोडीने यशस्वीरित्या पुढे नेला. त्यांच्या खेळीमुळे दिल्लीच्या १६ षटकांत ४ बाद १२६ धावा झाल्या होत्या. या जोडीला रोखण्यासाठी लखनौच्या गोलंदाजांनी आपला जोर लावला. मात्र या जोडीने आपली फटकेबाज सुरु ठेवून ७२ चेंडूंत १०० धावांची भागिदारी केली. त्यानंतर त्यांनी गोलंदाजांवर हल्ला करून शेवटी संघाला १७.१ षटकांत विजय मिळवून दिला.

## कोलकाता आणि हैदराबाद संघांत आज लढत
## सलग दुसरा पराभव टाळण्याचा प्रयत्न करणार

■ कोलकाता

**कोलकात्याच्या** ईडन गार्डन्सवर उद्या रात्री पार पडणाऱ्या आयपीएलच्या ६ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात लढत होणार आहे. हे दोन्ही संघ आपल्या पहिल्या सामन्यात विजयी सलामी देण्यात अपयश ठरले होते. त्यानंतर आता उद्याच्या म्हणजेच दुसऱ्या सामन्यात सलग दुसरा पराभव टाळण्याच्या प्रयत्नात दोन्ही संघ असणार आहेत. हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्मा आणि कर्णधार ईशान किशनच्या कामगिरीकडे क्रीडाप्रेमीचे लक्ष लागले आहे. बंगळुरू संघाविरूद्धच्या पहिल्या सामन्यात अभिषेक शर्मा ७ धावा आणि ट्रॅव्हिस हेड ११ धावा करुन झटपट बाद झाले होते. त्यामुळे आता अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांच्यावर संघाला चांगली सुरुवात करून देण्याची मोठी जबाबदारी असणार आहे. जबरदस्त लयात असलेला ईशान किशनकडून पुन्हा एखाद्या चांगल्या कामगिरीची संघाला अपेक्षा असून नितीश कुमार रेड्डी आणि सलील अरोरा यांना आपल्या संघाला विजयी करण्यासाठी मोठी खेळी करावी लागणार आहे. अनिकेत वर्माने बंगळुरूविरुद्ध अंतिम क्षणी १८ चेंडूंत ४३ धावांची वादळी खेळी केली होती. त्याच्याकडून पुन्हा अशा प्रकारची खेळीची अपेक्षा संघाला आहे. हैदराबादला आपल्या गोलंदाजीत सुधारणा करावी लागणार आहे.

## गोवा खो-खो लीग स्पर्धा
## २६ एप्रिल रोजी होणार

■ कुंकळ्ळी

**गोवा** खो-खो लीग (सीझन २) स्पर्धा २६ एप्रिलला सकाळी ८ वाजल्यापासून कुंकळ्ळी येथील डीएसवायए मैदानावर रंगणार आहे. स्वामी विवेकानंद स्पोर्ट्स क्लब यांच्या आयोजनाखाली ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत पुरुष गटात ६ संघ मैदानात उतरून अजिंक्यपदासाठी झुंज देणार आहेत. महिला गटात ४ संघ सहभाग घेणार आहेत. या स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया १० एप्रिलपर्यंत खुली ठेवण्यात आली असून इच्छुक खेळाडूंनी अधिकृत पद्धतीने नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. त्यानंतर १२ एप्रिलला खेळाडूंचा लिलाव पार पडणार आहे. ही लीग केवळ स्पर्धा नसून गोव्यातील क्रीडा संस्कृतीला नवी दिशा देणारी ठरणार आहे. युवा खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मोठे व्यासपीठ मिळणार असून स्थानिक ते राज्यस्तरीय खेळाडूंना संधी मिळणार आहे.

## पाल्र्यात कॅरम स्पर्धा! प्रशांत, समृद्धीला प्रथम मानांकन

■ विलेपार्ले

**विलेपार्ले** येथे प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ६ व्या रोटरी क्लब ऑफ मुंबई पार्लेश्वर राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत मुंबईच्या प्रशांत मोरे आणि ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरला प्रथम मानांकन देण्यात आले.

३ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता पुरुष एकेरी गटाने स्पर्धेला सुरुवात होईल. महिला एकेरी गटाचे सामने ४ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून खेळवले जातील. स्पर्धेच्या महत्त्वाच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्युब चॅनेलवरून करण्यात येणार आहे.

**पुरुष एकेरी मानांकनः** प्रशांत मोरे, झैद अहमद फारुकी, सागर वाघमारे, अभिजित त्रिपनकर, विकास धारिया, संदीप दिवे, सिद्धांत वाडवलकर, समीर महम्मद जाबीर अंसारी.

**महिला एकेरी मानांकनः** समृद्धी घाडीगावकर, आकांक्षा कदम, मिताली पाठक, रिंकी कुमारी, अंबिका हरिथ, प्राजक्ता नारायणकर, सोनाली कुमारी, चैताली सुवारे.

## मुंबई शहराचे कबड्डी संघ जाहीर
## शार्दूल व लेखा शिंदे कर्णधार

■ मुंबई

**नाशिक** येथे २ एप्रिलपासून होणाऱ्या ७३ व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने आज आपले पुरुष आणि महिला संघ जाहीर केले. गुड मॉर्निंगच्या शार्दूल पाटीलकडे पुरुष, तर स्वामी समर्थ मंडळाच्या लेखा शिंदेकडे महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली.





**पुरुष संघः-** शार्दूल पाटील(संघनायक), संकेत सावंत, साहिल राणे, ओमकार मोरे, रुपेश साळुंखे, राज आचार्य, ओमकार जाधव, अक्षय सोनी, अमन शेख, केतन मापेलकर, अमेय शिंदे, नंदिश बर्डे, तेजस वर्दम, तेजस टक्के.

**महिला संघः-** लेखा शिंदे(संघनायिका), पौर्णिमा जेधे, साक्षी सावंत, श्रावणी घाडीगावकर, शुभदा खोत, रिया मडकईकर, वैष्णवी जाधव, रोझी डिसोझा, योगिता राऊत, सोनल नाईक, श्रुतिका शिंदे, समृद्धी माळी, प्राची भदवणकर, ऋतू परब.

**पश्चिम रेल्वे**
**पेय पदार्थांचा पुरवठा**
मुख्य वाणिज्य व्यवस्थापक (केटरिंग), पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई हे **ई-निविदा क्र.ई-४२४४७३** आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव:** चर्चगेट येथील विभागीय खानपान विभागाला गरम व थंड पेयांचा पुरवठा. **ठिकाण:** चर्चगेट येथील विभागीय खानपान विभाग. **कामाचा कालावधी:** एक (१) वर्ष. **कामाचा अंदाजित खर्च:** रु.३२,७०,५०८.५० **ई-बोलीच्या ऑनलाईन सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ:** २०.०४.२०२६ रोजी ११:०० वा. अधिक तपशीलांसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या, किंवा निविदा प्रक्रियेबाबत ०२२-६७६२२५१०/२२५९२ या क्रमांकावर संपर्क साधा. 1276
आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**
**एलएचबी डब्यांच्या आधार व्यवस्थेतील दुरुस्ती**
**कामाचे नाव :** एलएचबी डब्यांच्या फीडर जंक्शन बॉक्सच्या आधार व्यवस्थेतील सुधारणा (प्रमाण - ४८० नग) **कामाचा अंदाजित खर्च:** रु.४५,३०,७४६.८८/- (रुपये पंचेचाळीस लाख तीस हजार सातशे सहेचाळीस आणि पैसे अठ्ठ्याऐंशी फक्त), **इरठे /बोली सुरक्षा:** रु.९०,६१५/-, **कामाचा कालावधी:** १२ महिने, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २२.०४.२०२६ रोजी १२:०० वा. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. निविदा केवळ www.ireps.gov.in या संकेतस्थळाद्वारे ई-निविदा स्वरूपात स्वीकारल्या जातील. निविदा दस्तऐवज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **ई-निविदा सूचना क्र.: पीजी_डीटीएल_७१०.** 03
सुरक्षित प्रवास करा, पायदानावरचा प्रवास टाळा

**PUBLIC NOTICE**
Notice is hereby given to all concerned persons, members of the public at large, banks/financial institutions, heirs, claimants, objectors, and any person having interest in the property mentioned herein.
WHEREAS my client Mrs. Rashminder Singh, acting through her constituted attorney Mr. Balbir Batra, has instructed me to issue the present Public Notice in respect of the immovable property and the society shares described below.
That Flat No. 301, admeasuring 1215 sq. ft., situated at Sai Sunrise Cooperative Housing Society Limited (hereinafter referred to as "the said Society"), Plot No. 55/C, Pali Naka, Sai Road, Bandra (West), Mumbai – 400050 (hereinafter referred to as "the said Flat"), stands in the joint names of (i) Smt. Jagwinder Kaur Lamba and (ii) Mrs. Rashminder Singh.
That the said Society has issued Share Certificate No. [ 005 ] for 5 (Five) shares of Rs. 50/- each, bearing Distinctive Nos. 21 to 25 (hereinafter referred to as "the said Shares"), in the joint names of Smt. Jagwinder Kaur Lamba and Mrs. Rashminder Singh.
That Smt. Jagwinder Kaur Lamba (mother of Mrs. Rashminder Singh) has expired on 24/01/26, leaving behind her legal heirs being her two daughters:(i) Mrs. Rashminder Singh; and(ii) Mrs. Kajal Nathowalia.
That Mrs. Kajal Nathowalia has relinquished her right, title and interest in respect of the said Flat in favour of her sister Mrs. Rashminder Singh.
That my client Mrs. Rashminder Singh has accordingly approached the said Society for deletion of the name of Smt. Jagwinder Kaur Lamba from the records of the Society, so as to enable my client to be recorded as the absolute owner/sole holder of the said Flat and the said Shares, as per the applicable rules and procedure of the Society.
Hence, the present Public Notice is being issued inviting claims/objections, if any, in respect of the said Flat and/or the said Shares and the proposed deletion of the name of Smt. Jagwinder Kaur Lamba. Any person(s) having any claim, right, title, interest, share, objection, lien, charge, mortgage, encumbrance or demand of any nature whatsoever in respect of the said Flat and/or the said Share Certificate and/or the said Shares, whether by way of inheritance, mortgage, charge, lien, transfer, sale, lease, possession or otherwise, are hereby required to submit their claim/objection in writing along with documentary proof to the undersigned at the address mentioned below within 15 (Fifteen) days from the date of publication hereof.
In case no claim/objection is received within the aforesaid period, it shall be presumed that there is no claim/objection from any person, and my client shall be entitled to proceed further with the said Society for necessary action including, as applicable, issuance of duplicate share certificate and/or effecting the changes in the Society records, and all such claims, if any, shall be treated as waived and abandoned.
Date 02.04.2026
Sd/-
**H. S. Sonkar**
**Advocate & Notary**
Flat A-101, Sandeep Sarovar CHSL,4 Bungalows, Andheri (W), Mumbai – 400053
Mob: 9820699987

# बस्तरच्या नक्षलमुक्त गावांना सरकार १ कोटी कधी देणार?

■ रायपूर



**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भूपेश बघेल यांचा सवाल**

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा यांनी घोषणा केली होती की, नक्षलमुक्त म्हणुन घोषित झालेल्या प्रत्येक गावाला १ कोटी रुपये कधी दिले जातील. मग आता नक्षलमुक्त झालेल्या बस्तरमधील गावांना १ कोटी रुपये कधी देणार असा सवाल छत्तीसगडचे काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी केला आहे.

भूपेश बघेल म्हणाले की,आमच्याच कार्यकाळात वन हक्क कायदा लागू केला, शाळा सुरू केल्या, आरोग्य सुविधांची स्थापना आणि रेशन कार्डाचे वाटप केले. मात्र भाजपा सरकारने हे फायदे नाकारले होते, तरीही आम्ही स्थानिक समुदायांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम केले.नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी झाल्यामुळे विकासकामे विस्तारली, ६०० गावे नक्षलमुक्त झाली आणि लोक मुख्य प्रवाहात परतले.

सोमवारी लोकसभेत बोलताना अमित शहा यांनी काँग्रेसवर आरोप केले होते. पण खरे तर अमित शहा हे खोटे दावे करत आहेत.नक्षलवाद हिंसाचार संपविण्यासाठी काँग्रेसने काही केले नाही. हे आरोप चुकीचे आहेत, असे बघेल म्हणाले.

# इंडिगोच्या सीईओपदी विल्यम वॉल्श यांची नियुक्ती

■ नवी दिल्ली

**भारतीय** विमान कंपनी इंडिगोने आज ब्रिटिश एअरवेज माजी प्रमुख विल्यम वॉल्श यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर केली. सध्या ते इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे महासंचालक आहेत. इंडिगोच्या निवेदनानुसार, इंटरग्लोब एव्हिएशन लिमिटेडच्या संचालक मंडळाने वॉल्श यांची सीईओ म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांचा इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनमधील कार्यकाळ ३१ जुलै २०२६ रोजी संपणार असून ते ३ ऑगस्ट २०२६ पर्यंत इंडिगोमध्ये रुजू होण्याची अपेक्षा आहे. विल्यम वॉल्श यांनी यापूर्वी ब्रिटिश एअरवेज आणि इंटरनॅशनल एअरलाइन्स ग्रुपचे सीईओ म्हणून काम केले आहे. इंडिगोचे अध्यक्ष विक्रम सिंह मेहता म्हणाले की , वॉल्श हे जागतिक विमानवाहतूक क्षेत्रातील उत्कृष्ट नेते आहेत. मोठ्या प्रमाणातील विमानसेवा संचालन आणि कठीण बाजार परिस्थिती हाताळण्याचा त्यांचा अनुभव इंडिगोच्या पुढील वाढीसाठी महत्त्वाचा ठरेल.

# 'क्वालिटी वॉल्स' आईस्क्रीमची मालकी नेदरलँडच्या मॅग्नमकडे

**६१.९ टक्के हिस्सा मिळवला**

■ नवी दिल्ली

**नेदरलँडच्या** मॅग्नम आईस्क्रीम कंपनीने हिंदुस्तान युनिलिव्हरच्या 'क्वालिटी वॉल्स' मधील ६१.९ टक्के हिस्सेदारी विकत घेऊन मालकी हक्क मिळवला आहे.३० मार्च २०२६ रोजी पूर्ण झालेल्या या व्यवहारामुळे आता 'क्वालिटी वॉल्स'चे नियंत्रण मॅग्नमकडे आले असून ते भारतातील प्रीमियम आईस्क्रीम मार्केटवर लक्ष केंद्रित करणार आहे.

याबाबतची माहिती 'क्वालिटी वॉल्स'ने शेअर बाजाराच्या फायलिंगमध्ये दिली आहे. या दोन कंपन्यांमध्ये झालेल्या करारानुसार, मॅग्नमने जुन्या प्रवर्तकांकडून म्हणजे युनिलिव्हरकडून क्वालिटी वॉल्सचे १४५.४४ कोटी इक्विटी शेअर्स खरेदी करण्यास सहमती दर्शवली होती. ही संख्या कंपनीच्या एकूण इक्विटी शेअर भांडवलाच्या ६१.९ टक्के आहे. प्रक्रियेनंतर जुन्या प्रवर्तकांचे वर्गीकरण प्रवर्तक गटातून सार्वजनिक गटात करण्यात आले आहे.त्याचप्रमाणे अभिजीत भट्टाचार्य यांची 'क्वालिटी वॉल्स'चे नवीन चेअरमन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढे क्वालिटी वॉल्स हे नाव कायम राहणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**देश विदेश**

# इस्त्रायलमध्ये पॅलेस्टिनी गुन्हेगारांना मृत्युदंडाची शिक्षा

■ तेल अवीव

**इस्त्रायलच्या** संसद नेसेटने पॅलेस्टिनी आरोपींना कठोर शिक्षा देणारे वादग्रस्त विधेयक मंजूर केले आहे. या कायद्यानुसार, वेस्ट बँकमधील पॅलेस्टिनींनी इस्त्रायली नागरिकांची हत्या केल्यास किंवा दहशतवादी कारवायांमध्ये सहभाग घेतल्यास त्यांना थेट फाशीची शिक्षा दिली जाऊ शकते. शिक्षा सुनावल्यानंतर ९० दिवसांच्या आत अंमलबजावणीची तरतूद आहे. हे विधेयक राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इत्तमार बेन ग्विर यांनी मांडले होते. वेस्ट बँकमध्ये पॅलेस्टिनींवर लष्करी कायदा, तर इस्त्रायली ज्यू वसाहतींवर नागरी कायदा लागू असल्याने एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या शिक्षा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# नवे तंत्रज्ञान नाही स्वीकारले तर धोका! टोयोटा प्रमुखांचा इशारा

■ टोकियो

**जागतिक** वाहन उद्योगात वेगाने बदल घडत असताना जपानमधील आघाडीची वाहन निर्मिती करणारी कंपनी टोयोटा मोटर कॉर्पोरेशनसाठी मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. कंपनीचे प्रमुख कोजी सातो यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, जर नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात उशीर केला तर कंपनीसाठी भविष्यात टिकून राहणे कठीण होऊ शकते.


कोजी सातो यांनी सांगितले की,जर आपण काळानुसार स्वतः मध्ये बदल केला नाही, तर कंपनी टिकून राहू शकणार नाही. हा इशारा केवळ त्यांच्या कंपनीपुरता मर्यादित नसून संपूर्ण वाहन उद्योगासाठी आहे.आजची वाहने केवळ यांत्रिक साधने राहिलेली नाहीत तर ती संगणकीय प्रणालीवर आधारित होत आहेत. त्यामुळे सॉफ्टवेअर, बॅटरी तंत्रज्ञान आणि नवी ऊर्जा यांचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. या बदलांकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपन्या मागे पडतील.तसेच त्यांनी चीनमधील वाहन कंपन्यांचा उल्लेख करत सांगितले की, त्या वेगाने नवे तंत्रज्ञान स्वीकारत आहेत आणि कमी किमतीत अधिक सुविधा देत आहेत.

# फ्लोरिडातील विमानतळाचे नामकरण! डोनाल्ड ट्रम्प आंतरराष्ट्रीय विमानतळ

■ वॉशिंग्टन

**पाम** बीच इंटरनॅशनल एअरपोर्टचे नाव बदलून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावावर ठेवण्यात आले आहे. एरिक ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत ही माहिती दिली.

फ्लोरिडामध्ये एक विधेयक मंजूर झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. या कायद्यावर रॉन डेसँटिस यांनी स्वाक्षरी केली असून, त्यामुळे विमानतळाला डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव देण्यास औपचारिक मान्यता मिळाली. ट्रम्प ऑर्गनायझेशनचे अधिकारी एरिक ट्रम्प यांनी एक्सवर पोस्ट करत लिहिले आह की, पाम बीच इंटरनॅशनल एअरपोर्ट आता अधिकृतपणे प्रेसिडेंट डोनाल्ड जे. ट्रम्प इंटरनॅशनल एअरपोर्ट'




म्हणून ओळखले जाईल.

फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनने स्पष्ट केले की विमानतळाच्या नामकरणाचे निर्णय स्थानिक पातळीवर घेतले जातात आणि त्यासाठी त्यांच्या मंजुरीची आवश्यकता नसते. मात्र, हा बदल पूर्णपणे लागू करण्यापूर्वी काही प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतील. यासाठी नेव्हिगेशन चार्ट आणि डेटाबेसमध्ये बदल करावा लागेल. ट्रम्प ऑर्गनायझेशनने स्पष्ट केले की या नामकरणामुळे राष्ट्राध्यक्ष किंवा त्यांच्या कुटुंबाला कोणताही आर्थिक फायदा होणार नाही. यात कोणतीही रॉयल्टी, परवाना शुल्क किंवा इतर आर्थिक लाभ समाविष्ट नसतील. या विमानतळाचे नवीन नाव १ जुलैपासून लागू होण्याची शक्यता असून, काही प्रशासकीय कामे अद्याप बाकी आहेत.

# हुंड्यासाठी गर्भवती पत्नीची हत्या आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा



■ बीड

**बीड** जिल्ह्यातील परळी तालुक्यातील आचार्य टाकळी येथे तीन महिन्यांच्या गर्भवती पत्नीची हत्या करणाऱ्या पती जगन्नाथ संदीपान आचार्य याला न्यायालयाने दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सासू संजीवनी आणि सासरे संदीपान यांना छळ व पुरावे नष्ट केल्याप्रकरणी प्रत्येकी दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

न्यायाधीश डॉ. रचना आर. तेहरा यांनी हा निकाल दिला. जगन्नाथ यांचा १७ फेब्रुवारी २०१९ रोजी मनीषा हिच्याशी मोठ्या थाटामाटात विवाह झाला होता. लग्नात सोने आणि संसारोपयोगी वस्तू देऊनही काही महिन्यांतच सासरच्या मंडळींकडून छळ सुरू झाला. पतीने कार खरेदीसाठी दोन लाख रुपयांची मागणी केली, तर सासू-सासऱ्यांनी विविध कारणांवरून मानसिक व शारीरिक अत्याचार केले. ५ ऑगस्ट २०२० रोजी मनीषाचा मृतदेह सासरी संशयास्पद स्थितीत आढळला. आरोपींनी तिने आत्महत्या केल्याचा बनाव रचला होता. मनिषाच्या वडिलांना अंगावरील जखमा व परिस्थिती संशयास्पद वाटल्याने त्यांनी हत्येचा संशय व्यक्त केला. शवविच्छेदन अहवालात डोक्याला व छातीला गंभीर मारहाण झाल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, मनीषा तीन महिन्यांची गर्भवती होती.सरकारी वकील ॲड. शिवाजीराव मुंडे यांनी न्यायालयात ठोस पुरावे सादर करत आरोपींचा गुन्हा सिद्ध केला.मनीषाचे वडील मनोहर काळे यांनी सहा वर्षे न्यायासाठी लढा दिला. आरोपींकडून खटला मागे घेण्यासाठी पैसे देण्याचा प्रयत्न झाला त्यांनी नकार देत न्यायालयीन लढा सुरू ठेवला.

# बारामती पोटनिवडणूक रंगत तीन बाहेरील उमेदवारांचे अर्ज

■ बारामती

**बारामती** विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, पहिल्याच दिवशी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. विशेष म्हणजे, हे तिन्ही उमेदवार बारामती मतदारसंघाबाहेरील आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री व बारामतीचे आमदार अजित पवार यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. पहिल्याच दिवशी जत तालुक्यातील सतीश कृष्णा कदम यांनी हिंदुस्तान जनता पार्टीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. तर सातारा येथील सागर शरद भिसे यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील राघू घुटुकडे यांनी न्यू राष्ट्रीय समाज पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादीकडून सुनेत्रा पवार या निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे निश्चित झाले आहे.

# मुंबई- मडगाव विशेष गाडी १२ एप्रिलपासून सुरू

■ मुंबई

**उन्हाळी** सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेने मुंबई -मडगाव विशेष गाड्यांच्या तारखांमध्ये आणि फेऱ्यांमध्ये बदल करत १८ विशेष गाड्या चालविणार असल्याचे जाहीर केले आहे. नवीन वेळापत्रकानुसार,या विशेष गाड्या ५ एप्रिल ऐवजी १२ एप्रिलपासून चालविण्यात येणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-मडगाव - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ट्रेन क्रमांक ०१११९ ही साप्ताहिक विशेष गाडी १२ एप्रिल ते ७ जून या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दर रविवारी ००.५५ वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी दुपारी १५.१५ वाजता पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०१०२० साप्ताहिक विशेष गाडी १२ एप्रिल ते ७ जून या कालावधीत मडगाव येथून दर रविवारी दुपारी १६.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ३.५० वाजता पोहोचेल.

या विशेष गाड्यांना दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी, थिवि आणि करमळी या स्थानकांवर थांबा देण्यात येणार आहे.

# डोंबिवली एमआयडीसीत ३ दिवस पाणीपुरवठा ठप्प

■ डोंबिवली

**स्थानिक त्रस्त**

**डोंबिवली** एमआयडीसीत ३ दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प असल्याने नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे नागरिकांनी मनसेच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास अधिकाऱ्यांना कार्यालयात बसू देणार नाही, असा इशाराही मनसेने दिला आहे.

डोंबिवली एमआयडीसी परिसरात गेल्या ३ दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प असल्यामुळे स्थानिक रहिवासी आणि नागरिक प्रचंड त्रस्त आहेत. अनेक दिवसांपासून काही भागात ८ दिवसांपासून पाणी येत नसल्याने रहिवाशांनी एमआयडीसी कार्यालयावर धडक दिली. मात्र, अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. पाणी नसल्यामुळे नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. एका टँकरसाठी साधारण २,००० ते २,५०० रुपये मोजावे लागत असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी केल्या आहेत. एमआयडीसी प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप स्थानिक रहिवासी आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी केला आहे. याव्यतिरिक्त, एमआयडीसी परिसरात वारंवार होणारी पाईपलाईन गळती आणि त्यामुळे रस्त्यावर वाया जाणारे लाखो लिटर पाणी हेदेखील पाणीटंचाईचे एक महत्त्वाचे कारण ठरत आहे.

# अलिबागचा पांढरा कांदा ३०० रुपये माळ

■ उरण

**अलिबागचा** प्रसिद्ध, औषधी पांढरा कांदा उरणच्या बाजारपेठेत दाखल झाला आहे.यावर्षी या कांद्याच्या एका माळेसाठी २०० ते ३०० रुपये दर मिळत आहे. कांद्याच्या आकारानुसार हे दर लावले जात आहेत. दर वाढले असले तरी उन्हाळी हंगामातील हा गोड, कमी तिखट आणि आरोग्यदायी कांदा स्थानिक ग्राहक व पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणावर खरेदी केला जात आहे.

# मोदींचा आसाममध्ये चहा मळ्यात कामगारांशी संवाद

पान ८ वरून

ईशान्य भारतातील जीवनमानात बदल झाला. महिला सक्षमीकरणावर भर देताना मोदी म्हणाले की, प्रत्येक ४० लाख कुटुंबांमागे एक बहीण करोडपती होईल. भाजपा सरकारने आपल्या जाहीरनाम्यात अरुणोदय योजनेत अधिक भगिनींचा समावेश करण्याचे आणि मदत वाढवण्याचे आश्वासन दिले आहे. आसाममध्ये समान नागरी संहिता लागू करणे आणि आपल्या आदिवासी समाजांच्या संस्कृतीचे जतन करणे, या प्रमुख घोषणा आहेत. भाजपा जे वचन देतो ते पूर्ण करतो. तुम्ही आसामला काँग्रेसच्या गैरकारभारातून मुक्त केले आहे. आता काँग्रेस नवीन डाव आखत असून, धोकादायक कायदा आणण्याची भाषा करत आहे.

# २०१४ पासून जनतेचा एप्रिल फूल! उबाठाचा मोदी सरकारला टोला

**मुंबई** - मोदी सरकारकडून सामान्य जनतेचा एप्रिल फूल २०१४ पासूनच होत आहे असा उपरोधिक टोला उबाठाने लगावला आहे. उबाठाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या एक्स पोस्टवर एक व्हिडिओ शेअर केला, ज्यात एप्रिल फूल या हिंदी चित्रपटातील एप्रिल फूल बनाया हे मोहम्मद रफी यांनी गायलेले गाणे आहे. व्हिडिओमध्ये त्यांनी म्हटले आहे की, येत्या एप्रिलपासून घरगुती सिलिंडर ५०० रुपये, सोन्याचा भाव ६५,००० रुपये, पेट्रोल ५५ रुपये प्रति लिटर, डॉलरच्या तुलनेत रुपया ४० रुपये होणार आहे. खोट्या आशेने इथपर्यंत आलात ना? पण एप्रिल फुल! मोदी सरकारकडून सामान्य जनतेचा एप्रिल फूल २०१४ पासूनच होत आहे.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 140 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost in Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN1018 EM1 | 3000067073 | BIENNIAL RATE CONTRACT FOR LIFTING, SHIFTING OF LT MOTORS, RECTIFORMERS AND OIL DRUMS AT KHAPERKHEDA TPS. | 1400049.68 | 17500.50 |
| TN1019 CHP1 | 3000067101 | WORK OF HIRING OF AMBULANCE AT KHAPERKHEDA TPS | 3991700.00 | 43417.00 |
| TN1020 EM1 | 3000067095 | WORK OF HT MOTOR REWINDING UPTO 500MW ON AS AND WHEN REQUIRED BASIS AT 210MW TPS KHAPERKHEDA. | 5409000.00 | 57590.00 |
| TN1021 TM1 | 3000067116 | PROCUREMENT OF SPARES OF TG SERVOMOTOR FOR UNIT 1 & 2 KHAPERKHEDA TPS. | 1550668.05 | 19006.68 |
| TN1023 EM1 Refloated | 3000067146 | WORK OF ON-LINE THOROUGH REMOVAL OF ADHERED CONTAMINANTS FROM ALL TYPES OF ELECTRICAL PANELS INSTALLED IN VARIOUS CONTROL ROOMS OF 210 MW KHAPERKHEDA TPS BY USING NCCC TECHNIQUE. | 16560630.75 | 169106.31 |
| TN1024 TM1 Refloated | 3000067134 | PROCUREMENT OF SPARES FOR BFP RECIRCULATION VALVES. (U#4 COH). | 851400.00 | 12014.00 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदूस्तान टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धते बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र ... नावडे येथील लेव्हल क्रॉसिंग क्र. १२ - ए वरील रोड ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) दुरुस्तीची कामे करणे. | ₹ १७,४०,४६,१७५.०० |
| २. | बोरीवली औद्योगिक क्षेत्र... नव्याने तयार करण्यात आलेल्या भूखंडांसाठी सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता, आर.सी.सी. गटार व नाला बांधणेबाबत. | ₹ ९,४३,३५,२७३.०० |
| ३. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर नाले व रस्त्याच्या कडील गटारांची साफसफाई तसेच इंजिनिअरिंग झोनमधील बांधकाम केलेल्या गटारांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई व अनुषंगिक कामे करणे. | ₹ २,३१,१८,२४२.०० |
| ४. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामायिक सांडपाणी केंद्रा मधील वापरात नसलेल्या सिमेंट काँक्रेटच्या यु ए एसबी टाकीची दुरुस्ती व मजबुतीकरण करून सांडपाणी साठविण्याकरिता उपयोगात आणणे तसेच कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३,६२,४५,०१०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०२/०४/२०२६ ते २७/०४/२०२६ पर्यंत व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र ०२/०४/२०२६ ते १६/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत दिनांक ०९/०४/२०२६ पूर्वी व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक ०६/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत दिनांक १४/०४/२०२६ पासून व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक ०८/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**ई–निविदा सुचना**
**मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित**

मुख्य अभियंता (स्था), एमएसईबीएचसीएल, मुंबई ई – निविदा क्र. CEC/MSEBHCL/MUM/TECH/T-01-2026-27 ला आमंत्रित करत आहेत. बिड कागदपत्रे ०२.०४.२०२६ पासुन वेबसाइटवर उपलब्ध होतील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in, ई–निविदा दुव्यास https://etender.mahadiscom.in ला भेट द्या. फोन नं. ०२२–२२६०८३८३

HO PR No. 79/26-27 Dt.01.04.2026 मुख्य अभियंता (स्थापत्य)



**वाडा नगरपंचायत**
ता.वाडा, जि.पालघर
मु.पो.ता. वाडा जि . पालघर पिन - ४२१३०३.
www.wadanagarpanchayat.in nagarpanchayatwada@gmail.com
whatsapp no. 9922770550 toll free complaint no. 18002331180

जा.क्र. वानप/२७/२०२६ दि. ०१/०४/२०२६

**ई-निविदा सूचना**

मा. मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत, यांच्यातर्फे ०२ विकास कामांसाठी तसेच ०२ वार्षिक ठेक्यांचे शासनाकडील आवश्यक वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार/ सेवा पुरवठादार/ यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांची निविदा महाराष्ट्र शासनाच्या http:\\ mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०२/०४/२०२६ दु. ३.०० वाजेपासून आपण सादर करू शकतात.

सही/-
(मनोज पष्टे)
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत



**नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. (सिटीलिंक)**
सीआयएन – U60100MH2019PLC324953
सिटीलींक भवन, वीर सावरकर तरण तलाव समोर, गोल्फ क्लब ,त्रंबकरोड, नाशिक – ४२२००२. ईमेल आयडी : gmadmin_citilinc@nmc.gov.in

**अल्प मुदतीची ई– निविदा सूचना क्र. 03 / २०२६**

नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. (सिटिलिंक) नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. (सिटिलिंक) कंपनीच्या कामकाजासाठी लागणारी स्टेशनरी व छपाई चे कामकाज करणेबाबतची नोटीस प्रसिद्ध करणेबाबत महाराष्ट्र शासन अथवा केंद्र शासनाच्या अथवा निम शासकीय संस्थेकडे योग्य वर्गातील पंजीकृत काम करण्याचा अनुभव असलेल्या मक्तेदाराकडून ई–टेंडर (ऑनलाइन) निविदा मागवित आहोत.

सविस्तर निविदा सुचना https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क/जा.क्र/०१/२०२६
दि.१/०४/२०२६
गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

सही/
महाव्यवस्थापक (प्रशासन व तांत्रिकी)
नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. (सिटीलिंक)

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# हत्तींच्या छळावरुन रुपालीचे पंतप्रधानांना पत्र



**राजस्थानमधील** एका छायाचित्रणादरम्यान हत्तीला गुलाबी रंगाने माखल्याच्या धक्कादायक प्रकारानंतर देशभरात संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध अभिनेत्री आणि 'पेटा' इंडियाची समर्थक रुपाली गांगुली यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून हत्तींच्या सफारीवर कायमची बंदी घालण्याची आग्रही मागणी केली आहे.

या पत्रात गांगुली यांनी हत्तींच्या मनोरंजनासाठी होणाऱ्या अमानवीय वापराऐवजी 'रोबोटिक' हत्ती किंवा इतर तांत्रिक पर्यायांचा वापर वाढवण्याचे आवाहन केले आहे.

या विशिष्ट छायाचित्रणामध्ये सहभागी असलेल्या चंचल नावाच्या हत्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, याबद्दल गांगुली यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी पत्रात नमूद केले आहे की, संबंधित हत्तीचा मालक हा यापूर्वीही मालती नावाच्या हत्तीला झालेल्या अमानवीय मारहाणीच्या प्रकरणात चर्चेत आला होता. आमेर किल्ल्यासारख्या ठिकाणी पर्यटनासाठी वापरल्या जाणाऱ्या हत्तींना साखळदंडात जखडून ठेवले जाते आणि त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी हिंसक शस्त्रांचा वापर केला जातो, ज्यामुळे या प्राण्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो.

जागतिक वन्यजीव दिनानिमित्त पंतप्रधानांनी दिलेल्या वन्यजीव संरक्षणाच्या संदेशाचा हवाला देत रूपाली गांगुली यांनी भारतातही इंडोनेशियाप्रमाणे हत्तींच्या सफारीवर बंदी घालण्याची विनंती केली आहे.

# साराची 'भाडेकमाई'



बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खानने मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील आपला आलिशान बंगला दीर्घकालीन करारांतर्गत भाड्याने दिला आहे. पाच वर्षांच्या या लीज कराराची एकूण किंमत सुमारे ४.१४ कोटी रुपये असल्याचे मालमत्ता नोंदणी कागदपत्रांवरून स्पष्ट झाले आहे. ओल्ड लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये असलेला हा बंगला शैक्षणिक उपक्रमांसाठी भाड्याने देण्यात आला आहे.

या व्यवहाराच्या अटींनुसार, सुरुवातीच्या टप्प्यात या बंगल्याचे मासिक भाडे ६.५ लाख रुपये निश्चित करण्यात आले आहे. या करारात ३ वर्षांचा लॉक-इन कालावधी समाविष्ट असून, तिसऱ्या वर्षापासून भाड्यामध्ये वार्षिक ५ टक्के वाढ होणार आहे. भाडेकरूने सुरक्षित ठेव म्हणून २० लाख रुपये जमा केले असून हा करार १ मे २०२६ पासून लागू होणार आहे. अंदाजे ४,५०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेल्या या बंगल्यासाठी प्रति चौरस फूट १४४.४४ रुपये असा दर आकारण्यात आला आहे.

अंधेरी पश्चिम आणि लोखंडवाला परिसर चित्रपट उद्योगाच्या जवळ असल्याने या भागात सेलिब्रिटींच्या मालमत्तांना मोठी मागणी असते. सारा सध्या अनेक चित्रपट आणि व्यावसायिक प्रकल्पांमध्ये व्यग्र असतानाच तिने रिअल इस्टेटमधील आपल्या गुंतवणुकीतून उत्पन्नाचा हा नवा स्त्रोत निश्चित केला आहे.

# 'भूत बंगला'चाही पेड प्रिव्ह्यू?



अक्षय कुमारची मुख्य भूमिका असलेल्या 'भूत बंगला' या बहुप्रतिक्षित हॉरर-कॉमेडी चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या चित्रपटाचा ट्रेलर आता ६ एप्रिल रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता असून, चित्रपट १७ एप्रिलला प्रेक्षकांच्या भेटीला येण्याचे संकेत मिळत आहेत. सुरुवातीला हा चित्रपट १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु आता प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आल्याची चर्चा चित्रपटसृष्टीत रंगली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निर्माते ६ एप्रिल रोजी एका भव्य कार्यक्रमात चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्याचे नियोजन करत आहेत. यापूर्वी २७ आणि ३० मार्च रोजी ट्रेलर प्रदर्शित होणार असल्याच्या चर्चा होत्या, मात्र तांत्रिक कारणांमुळे त्यात बदल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी, म्हणजेच गुरुवार, १६ एप्रिलच्या संध्याकाळी 'पेड प्रिव्ह्यू' आयोजित करण्याबाबतही वितरक आणि प्रदर्शकांशी चर्चा सुरू आहे. अलिकडच्या काळात 'स्त्री २' आणि 'धुरंधरः द रिव्हेंज' यांसारख्या चित्रपटांनी 'पेड प्रिव्ह्यू'च्या माध्यमातून बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवले आहे. 'धुरंधरने तर पेड प्रिव्ह्यूमधून ५० कोटी रुपयांची विक्रमी कमाई केली होती. याच धर्तीवर 'भूत बंगला' देखील प्रदर्शनापूर्वीच प्रेक्षकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे.

# शबाना आझमींचे वेगळे रूप



ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी यांची प्रमुख भूमिका असलेली ब्रिटिश दूरचित्रवाणी मालिका 'नेक्स्ट ऑफ किन' आता भारतीय प्रेक्षकांसाठी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. या कौटुंबिक थ्रिलरमध्ये शबाना आझमी यांनी साकारलेली मिसेस शिराणी ही व्यक्तिरेखा आशियाई मातांच्या रूढ चौकटी मोडणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'लायन्सगेट प्ले'वर प्रदर्शित होणाऱ्या या मालिकेच्या पार्श्वभूमीवर शबाना आझमी आणि अर्ची पंजाबी यांनी आपल्या भूमिकांविषयी सविस्तर चर्चा केली. शबानांच्या मते, मिसेस शिराणीचे व्यक्तिमत्व अतिशय स्वतंत्र आणि प्रभावशाली आहे. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्यात तिची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेष म्हणजे, ही व्यक्तिरेखा धार्मिक श्रद्धा जपणारी असली तरी मूलतत्त्ववादाच्या विचारांपासून ती पूर्णपणे दूर आहे.

पॉल रटमन यांची निर्मिती आणि जस्टिन चॅडविक यांचे दिग्दर्शन असलेल्या या मालिकेत जॅक डॅवेनपोर्ट, नवीन चौधरी आणि फर्जाना दुआ इलाहे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. प्रेम, निष्ठा आणि कुटुंबासाठी आपण कोणत्या थराला जाऊ शकतो, यावर भाष्य करणारी ही मालिका प्रेक्षकांसाठी एक भावनिक अनुभव ठरेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# मिनाक्षी शेषाद्रींचे चोख प्रत्युत्तर



**बॉलीवूडच्या** ज्येष्ठ अभिनेत्री मिनाक्षी शेषाद्री यांनी १९८८ मधील 'शहेनशहा' चित्रपटातील त्यांच्या गाजलेल्या 'हे यू' या गाण्यावर डान्स करून सोशल मीडियावर पुन्हा एकदा धुमाकूळ घातला आहे. वयाच्या ६२ व्या वर्षीही त्यांची ऊर्जा आणि अदाकारी पाहून चाहते थक्क झाले असून, या व्हिडिओला मोठी पसंती मिळत आहे. मात्र, या व्हिडिओवर काहींनी वयावरून टीका करण्याचा प्रयत्न केला, ज्याला मिनाक्षी यांनी अत्यंत सकारात्मकतेने आणि आत्मविश्वासाने सामोरे जात ट्रोलर्सची बोलती बंद केली आहे.

मिनाक्षी यांनी हा व्हिडिओ शेअर करताना या गाण्याशी संबंधित काही आठवणींना उजाळा दिला आहे. त्यांनी नमूद केले की, त्यांच्या कारकिर्दीतील सुरुवातीच्या काही आयटम सॉंगसपैकी हे एक होते आणि त्यांचे लाडके अभिनेते अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा हा त्यांचा पहिला ऑन-स्क्रीन अनुभव होता. या रीलचे चित्रीकरण पुण्यातील पावसात करण्यात आले आहे. त्यांच्या कोरिओग्राफर स्वरा आणि फहीम यांच्या टीमने हा व्हिडिओ अत्यंत कल्पकतेने चित्रित केला आहे. व्हायरल झालेल्या गाण्यावरुन ट्रोल करणाऱ्यांना प्रत्युत्तर देताना मिनाक्षी म्हणतात की, सौंदर्य आणि कलेला वयाचे बंधन नसते.


# चर्चा आमीरने दिलेल्या दुर्मीळ अंगठ्यांची



**बॉलीवूडचा** 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमीर खान सध्या एका खास वैयक्तिक निर्णयामुळे चर्चेत आला आहे. आगामी मे महिन्यात लाँच होणाऱ्या 'क्वीन' या लक्झरी ज्वेलरी ब्रँडचा तो पहिला अधिकृत ग्राहक ठरला आहे. आमीरने गौरी स्प्रॅटसाठी या ब्रँडकडून दोन अत्यंत दुर्मीळ आणि खास तयार केलेल्या अंगठ्यांची निवड केली असून, त्यातील ॲक्वामरीन अंगठीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. विशेष म्हणजे, आमीरने 'क्वीन'मध्ये धोरणात्मक गुंतवणूकदार म्हणूनही सहभाग घेतला आहे. कलाकारांनी एखाद्या ब्रँडमध्ये गुंतवणूक करणे ही सामान्य बाब असली, तरी स्वतःच्या गुंतवणुकीतून अशा प्रकारे वैयक्तिक खरेदी करून ब्रँडवर विश्वास दर्शवणे दुर्मिळ मानले जाते.

आमीरने प्रेमाच्या विविध भावना व्यक्त करण्यासाठी एकाऐवजी दोन स्वतंत्र अंगठ्यांची निवड केली असून यात ॲक्वामरीन आणि रुबी या रत्नांचा समावेश आहे. ॲक्वामरीन अंगठीच्या मध्यभागी समुद्रासारख्या निळ्या रंगाचे अत्यंत दुर्मीळ रत्न आहे. ब्राझीलमधून मिळवलेले हे रत्न सोन्यामध्ये जडवण्यात आले असून त्याच्याभोवती ४० नैसर्गिक हिऱ्यांचे कडे आहे. मुंबईतील कारखान्यात १३१ कारागिरांनी ३६३ तासांहून अधिक कष्ट घेऊन ही कलाकृती साकारली आहे. दुसरी अंगठी मादागास्करमधून मिळवलेल्या नैसर्गिक माणिकाची असून ही अंगठी पूर्ण करण्यासाठी तब्बल ८१२ तास लागले आहेत.

# गॅस टंचाईमुळे कोल्हापुरात हजारो रिक्षांचा व्यवसाय बंद



■ कोल्हापूर

**सध्या** गॅसटंचाईमुळे कोल्हापूर शहरातील रिक्षा व्यवसाय अडचणीत आला आहे. सीएनजीचे दर वाढले आहेत. शिवाय अनेक गॅस पंप बंद आहेत. परिणामी शहरातील एक हजारहून अधिक रिक्षा बंद आहेत.

रुईकर कॉलनी चौक, कदमवाडी रोड,कळंबा तपोवन मैदान परिसर आणि सरनोबतवाडी अशा तीन ठिकाणी रिक्षांसाठी पंप आहेत. दोन दिवसांपासून कदमवाडी रोड आणि तपोवन येथील पंप बंद आहेत.सरनोबतवाडी येथे काल ७०० हून अधिक रिक्षा रांगेत होत्या. कोल्हापुरात सुमारे २२ हजार रिक्षा आहेत. कर्नाटकमध्ये ८५ रुपये किलो मिळणारा गॅस कोल्हापुरात १०५ रुपयांस विक्री होत असल्याची माहिती रिक्षा संघटनेच्या नेत्यांना मिळाली. त्यामुळे सोमवारी ते पंप चालकांना जाब विचारण्यासाठी गेले. परंतु गॅस नसल्याने पंप बंद होता. त्यामुळे रिक्षा चालकांनी निदर्शने केली.

अनेक रिक्षा चालक शाळेतील मुलांना सोडण्याचे काम करतात. आजपासून परीक्षा सुरू झाल्या आहेत. गॅस नसल्याने बहुतांशी रिक्षा चालकांनी विद्यार्थ्यांना शाळेत सोडू शकत नसल्याचे पालकांना सांगितले. त्यामुळे परीक्षा संपेपर्यंत पालकांनाच आता मुलांना शाळेत सोडावे लागणार आहे.

# धर्माचा प्रसार करणे हा घटनात्मक अधिकार

■ मुंबई

**प्रत्येक** व्यक्तीला आपल्या धर्माचा आणि धार्मिक विचारांचा प्रसार करण्याचे 'घटनात्मक स्वातंत्र्य' आहे, असे महत्त्वपूर्ण निर्वाळा सत्र न्यायालयाने एका प्रकरणात दिला. ६४ वर्षीय महिलेवर झालेल्या जमावाच्या हल्ल्याप्रकरणी दंडाधिकारी न्यायालयाने दिलेला जुना निकाल रद्द ठरवत सत्र न्यायालयाने हा निर्णय दिला.

९ एप्रिल २०११ रोजी युनिस जोसेफ नावाची महिला आपल्या मैत्रिणीसह भांडुपमधील टेंभीपाडा येथे बायबलमधील संदेशांचा प्रचार करण्यासाठी गेली होती. तिथे अनोळखी महिलेने त्यांच्या उपस्थितीवर आक्षेप घेतला होता. त्यातून वाद झाला आणि प्रमोद नावाच्या व्यक्तीने धार्मिक चित्र जमिनीवर फेकून जमावाला चिथावणी दिली. सुमारे २० जणांच्या जमावाने महिलेला मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात प्रतिवादींनी केलेल्या आरोपांच्या आधारे अर्जदार आणि तिच्या एका मित्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**सत्र न्यायालयाचा निकाल**

परंतु, युनिसने जमावाकडून हल्ला झाल्याचा आरोप केला असून त्यानंतर तिची व तिच्या मित्राची वैद्यकीय तपासणी केली असूनही पोलिसांनी त्यांच्या तक्रारीनुसार काऊंटर एफआयआर दाखल केला नाही. दंडाधिकाऱ्यांनीही या वस्तुस्थितीचा विचार केला नाही. उलट, ज्या पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास नकार देऊन पक्षपाती भूमिका घेतली होती, असे निरिक्षण अतिरिक्त सत्र न्यायाधीश मुजीबोद्दीन एस. शेख यांनी नोंदवले. त्याच अनुषंगाने प्रकरणाची नव्याने सुनावणी घेण्याचे आणि तक्रारदार महिलेचे पुरावे नोंदवण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे आता आरोपींविरुद्ध दंडाधिकारी न्यायालयात नव्याने खटला चालवला जाणार आहे.


# समृद्धी महामार्गावर ट्रकची धडक ६ सफाई कामगार महिलांचा मृत्यू

■ जालना

**समृद्धी** महामार्गावरून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने महामार्गाची सफाई करणाऱ्या महिला कामगारांच्या गाडीला आज सायंकाळी धडक दिली. त्यात ६ जणींचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघी गंभीर जखमी झाल्या. जालना जिल्ह्याजवळील जामनेर-कडवंची शिवारात हा अपघात झाला.

कडूबाई मदन (४५), ताराबाई चौधरी (४५), लक्ष्मीबाई मदन (३५), अलका आदमाने (४५), मीना आदमाने (४४), कांचन आदमाने (५०) अशी मृत महिलांची नावे आहेत. समृद्धी महामार्गावरील सफाईचे काम आटोपून महिला परतत होत्या. त्यांची गाडी महामार्गाच्या कडेला उभी असताना मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकने गाडीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कामगारांच्या गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. यामध्ये सात महिला कामगारांना जागीच आपले प्राण गमवावे लागले, तर अन्य जखमींना उपचारासाठी तातडीने जालन्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.अपघातामुळे महामार्गावरील मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

# नाशिक जिल्ह्यात गारांचा पाऊस कांदा आणि डाळिंब बागा उद्ध्वस्त



■ नाशिक

**जिल्ह्यातील** मालेगाव, निफाड, चांदवड, सिन्नर आणि बागलाण तालुक्यांत वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली आहे. यामुळे कांदा, गहू व द्राक्ष पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सलग तीन दिवस पडलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून अनेक ठिकाणी गारपिटीमुळे पांढरी चादर पसरली होती. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.

निफाड तालुक्यातील जळगाव फाटा, कोठुरे, मालेगाव,सिन्नर तालुक्यातील वावी, पाथरे, देवळा, बागलाण तालुक्यातील सटाणा आणि चांदवड तालुक्यात पिकांचे प्रचंड नुकसान आहे.

काढणीला आलेला गहू, कांदा आणि डाळिंब बागांची मोठी हानी झाली आहे.अनेक ठिकाणी शेतात गारांचा पांढरा थर साचल्याचे दृश्य होते. हवामान विभागाने पुढील ५ दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. दरम्यान, मालेगावात भिंत कोसळून एका मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानाची शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल पाहणी केली. नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. मालेगाव तालुक्यातील ढवळेश्वर,पांढरुण व डोंगराळे परिसर तसेच बागलाण तालुक्यातील आराई,भक्षी व चौगाव रोड येथे नुकसान झालेल्या पिकांची मंत्री भुसे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

# शनिशिंगणापुरात गावकरी गेट स्थानिकांसाठी दिवसभर खुले

■ अहिल्यानगर

**श्री** क्षेत्र शनिशिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थानात 'गावकरी गेट' दिवसभर खुले ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे स्थानिक ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गावकरी गेट खुले करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती. यापूर्वी हे गेट केवळ आरतीच्या वेळीच उघडले जात होते आणि त्या वेळीच स्थानिकांना थेट प्रवेश दिला जात होता. मात्र आता मंदिर सुरू झाल्यापासून ते बंद होईपर्यंत 'गावकरी गेट' खुले ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार पहाटे ४ ते रात्री १० वाजेपर्यंत हे गेट खुले राहणार आहे.

# ट्रम्प-पुतिन केरळच्या प्रचारात एआय व्हिडिओ व्हायरल

■ थिरुवनंतपुरम

**अमेरिकेचे** माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन हे चक्क केरळ विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरल्याचे पाहून अनेकजण आश्चर्यचकित झाले. मात्र, ते प्रत्यक्ष प्रचारात उतरले नसून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करण्यात आलेला व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



या व्हिडिओमध्ये हे तिन्ही नेते केरळच्या पारंपरिक वेशभूषेत वेगवेगळ्या पक्षांचे प्रतिनिधी म्हणून प्रचार करताना दिसतात. ट्रम्प पांढरा शर्ट आणि भगवा स्कार्फ घालून भाषण करताना, पुतिन लाल गमछ्यासह प्रचार करताना, तर किम जोंग उन घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद साधताना दाखवले आहेत.

या व्हिडिओमध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांसारखे इतर नेतेही प्रचार करताना दिसतात. बाजारपेठा आणि रस्त्यांवर प्रचार करतानाचे दृश्य इतक्या वास्तविक साकारले आहे की, हा व्हिडिओ खरा असल्याचा भास होतो. केरळची स्थानिक संस्कृती, वेशभूषा आणि चालीरीतींचे अचूक चित्रण हे या व्हिडिओचे वैशिष्ट्य ठरले आहे.

# घरांच्या थकीत भाड्यावरील व्याज कमी करा शिवशाहीकडे विकासकांची मनधरणी

■ मुंबई

**घरांच्या** थकीत भाड्याच्या रकमेवर आकारण्यात येणारी १८ टक्के व्याज दराची रक्कम कमी करण्यात यावी अशी मनधरणी खासगी विकासकांनी शासनाच्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाकडे केली आहे. अशी माहिती हाती आली आहे.

मुंबईसह उपनगरात काही भागात शिवशाही कार्यालयाच्या इमारती आहेत. एसआरए योजनेतील संबंधित रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपात राहाता यावे यासाठी काही विकासकांनी शिवशाहीच्या इमारतीतील घरे महिना आठ हजार रुपये नुसार भाड्यावर अनेक वर्षांपूर्वी घेतली आहेत. शिवशाही कार्यालयाच्या म्हणण्यानुसार घरांच्या थकीत भाड्याच्या रकमेवर आम्ही १८ टक्के व्याज आकारतो. या व्याजाच्या रकमेत कपात करून कमी व्याज आकारावे. अशी विकासकांची मागणी आहे. जवळपास पाच विकासकांच्या ताब्यात ६५० घरे आहेत. त्यांच्याकडे ११६ कोटी रुपये थकीत भाड्याची रक्कम येणे आहे. मात्र व्याजाच्या रकमेतील कपातीचा निर्णयावर शिवशाही कार्यालयाने विचार केलेला नाही असे एका अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.


# अजिंठा लेणीत मधमाश्यांचा हल्ला! ११ पर्यटक जखमी

■ छत्रपती संभाजीनगर

**जागतिक** वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी परिसरात मधमाश्यांनी दोन वेळा हल्ला केल्याने देश-विदेशातून आलेले ११ पर्यटक जखमी झाले.

सकाळच्या सुमारास लेणी क्रमांक १० जवळील मोहोळातून मधमाशा अचानक बाहेर पडल्या आणि त्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. यामध्ये काही पर्यटक जखमी झाले. या घटनेनंतर अवघ्या तासाभरात लेणी क्रमांक २६ जवळ पुन्हा मधमाश्यांनी हल्ला केला. दुसऱ्या हल्ल्यातही अनेकांना चावा बसल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.

दररोज हजारो पर्यटक अजिंठा लेणी पाहण्यासाठी येतात.



मात्र, गेल्या दोन महिन्यांत मधमाश्यांच्या हल्ल्याची ही पाचवी घटना असल्याने विशेषतः महिला आणि लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी तैनात यंत्रणेला मधमाश्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यात अपयश येत आहे. दरम्यान, जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असूनही येथे मधमाश्यांच्या मोहोळांबाबत कायमस्वरूपी उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाकडून पर्यटकांना आवाहन करण्यात आले आहे की, लेणी परिसरात फिरताना गडद रंगाचे कपडे टाळावे. तसेच सुगंधित द्रव्यांचा वापर करू नये, कारण त्यामुळे मधमाशा अधिक आक्रमक होण्याची शक्यता असते.


# जम्मू-काश्मीरमध्ये चकमक एका दहशतवाद्याचा खात्मा

■ गांदरबल

**जम्मू-काश्मीरमधील** गांदरबल जिल्ह्यात रात्रभर चाललेल्या चकमकीत एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे, अशी माहिती लष्कराने दिली.

संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर मंगळवारी रात्री सुरक्षा दलांनी गांदरबल जिल्ह्यातील अरहामा परिसरात घेराबंदी करून शोधमोहिम सुरू केली. गुप्तचर माहितीच्या आधारे लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. शोधमोहिमेदरम्यान जवानांना संशयास्पद हालचाली आढळून आल्या. जवानांनी आवाहन केल्यानंतर दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनी चोख प्रत्युत्तर दिल्याने चकमक सुरू झाली. परिसरातील सर्व मार्ग बंद करून दहशतवाद्यांना घेरण्यात आले आहे. चकमकीदरम्यान एका दहशतवाद्याला ठार करण्यात आला असून, या भागात आणखी काही दहशतवादी लपल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# नवाकाळ शब्दकोडे–१५६३



**आडवे शब्द –**

१. गुन्हा ४. श्रीकृष्णाने लहान असताना या महासर्पाचा वध केला ७. धेनू ९. अविरत, खंड न पडता १२. सत्य १३. भवानीमातेचे उग्र रूप १६. उडी १८. सरकारी १९. सहाय्य २०. सहदेवाचा सख्खा भाऊ, माद्रीचा पुत्र २२. अविचाराने घाईत कृती करणारा २४. मोकळा, स्वतंत्र २५. चिखल, धुडगूस २८. वानवळा, मासला ३०. दशरथाचा ज्येष्ठ पुत्र ३२. काकांची मुलगी ३३. औषधालय ३४. ब्याद, संकट, पीडा ३६. पावसाळी ढग ३८. गजानन ४१. दुष्ट बेत, कारस्थान ४२. ऑफिस, कार्यालय ४३. शिखर ४५. नम्र ४६. डाक ४९. शास्त्र ५१. गवताची मोळी ५२. वातावरणातील प्रमुख घटक ५४. गरजू, नडलेला ५५. भावजय ५६. ओली साखर ५८. मापापेक्षा भारावर विकण्याची पद्धत ६०. सहजी वठणीवर न येणारा ६२. पूर्वसूचना न देता ६४. जमीन, भूमी, धरणी ६६. दया, कीव ६७. आपल्याच धुंदीत असलेला ६९. अडथळा, विरोध ७०. हिंदीतील ठावठिकाणा ७३. दृष्टीहीन ७४. नुकसानकारक ७५. भारताचे दक्षिणेकडचे टोक ७८. वलयाकार लाट ७९. रोख, रोकड ८१. थोडासा ८४. कवितेच्या ओळीतील शेवटची अक्षरे सारखी असणे ८५. आपल्या पायावर उभा असलेला, मिळवता ८९. अपत्यप्राप्तीसाठी राजा दशरथाने केलेला यज्ञ ९१. संकोचणारा, बुजऱ्या स्वभावाचा ९२. टेंभा, पलिता ९३. नेभळट, लेचापेचा ९४. रेलचेल, मोठ्या प्रमाणावर पैदास होणे ९५. बैठे स्वतंत्र घर ९६. बायको ९७. नेहमी टिंगल करणारा ९८. कागदावरील स्तंभ

**उभे शब्द –**

१. आच, उष्णता २. भस्म, रक्षा ३. जमीनदोस्त ४. वाळकी काडी ५. प्रहर ६. वैषम्य ७. थंड ८. जुळा, जावळा ९. लगामाची दोरी १०. अवजड वाहनात वापरले जाणारे इंधन ११. बारा वर्षे १४. बर्फ १५. किंचित १७. अनुराग, प्रेम १८अ. आगऱ्याजवळची नदी २१. अडचण २२. वेष्टन, गवसणी २३. एखाद्याच्या अंकित असलेली व्यक्ती २६. हळूवारपणे २७. मजबूत २९. विपुल ३०. नारळ ३१. रात्र ३५. वीज ३७. आपसातील संपर्क ३९. जंगल ४०. भगवान शंकर ४१. भांडण ४४. प्रतिभा, बुद्धी ४७. ठाम निश्चय करणे ४८. मावशी बनून बालकृष्णाला गोकुळात मारायला आलेली राक्षसीण ४९. विनम्र ५०. बोअरवेल ५१. गणगोत ५३. चौकशी, विचारपूस ५७. स्वच्छ ५९. ढग ६१. व्यवस्थित ६३. अर्धचंद्र, हकालपट्टी ६५. नियम ६७. पुष्परस, मकरंद ६८. अवाजवी किंमतीचे, मौल्यवान ६९. 'हातच्या कांकणाला ××× ×××' प्रसिद्ध हिंदी म्हणीचा अर्धा भाग ७०. चाणक्याचे पद ७१. 'देव ×× त्याला कोण मारी' ७२. वडील (सं.) ७३. शरीराची ठेवण, चण ७४. वर्षाव ७६. योग्य निर्णय ७९. मिमिक्री करणारा कलाकार ८०. विजयादशमी ८१. पाणी ८२. धन, अमानत ८३. धागा ८६. वस्तू, जिन्नस ८७. प्रतिकूल टिप्पणी ८८. तह, युद्धबंदी ८९. भेकड ९०. पाषाण ९१अ. करपलेला ९२. नंतर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५६२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. आत्याबाई ४. वाच्यता ६. चाबूक ८. सुमन ११. लाखोली १३. रजनी १५. सोमरस १७. सुख १८. चकोल्या १९. पतन २०. आटीव २१. नखरेल २२. रण २५. मद्य २६. सनद २८. मासलेवाईक ३१. झुंड ३२. बारव ३५. वैरी ३६. खडी ३७. वात ३९. केसरी ४१. खाचखळगे ४४. हयगय ४५. माकड ४७. रमी ४८. ठसठशीत ५१. तम ५२. आस ५३. रजक ५७. गरूड ५९. निकाल ६०. आमिष ६२. कुलटा ६४. सुरमा ६६. हरळी ६८. कडा ६९. पतित ७१. जनरीत ७४. सहारा ७६. पीठ ७८. नवकवी ८१. गजानन ८४. उर्वशी ८६. तयार ८७. तट्टू ८८. खातरजमा ८८अ. कचरा ८९. खासदार ९१. दुसरा ९२. माड ९३. गडप ९५. आटवल ९७. रास ९९. करकर १०१. लवलेश १०३. काज १०४. करवली १०७. बैल रिकामा १०८. पाणवठा

**उभे शब्द** : २. त्याला कोण मारी ३. ईला ४. वाली ५. तारतम्य ६. चानी ७. कसोटी ८. सुर ९. मसनद १०. चिखल १२. खोके १४. जन १६. मवसर १७. सुरेल १८. चर २०. आद्य २३. आलेख २४. वई २५. मडके २७. नवखा २९. वाडी ३०. कवायत ३२. बारीक ३३. जखमी ३४. लगेच ३५. वैकुंठ ३८. तगमग ४०. समास ४२. चरक ४३. राठ ४६. डरकाळी ४९. सकल ५०. शीर ५२. आड ५४. जल ५५. श्रमिक ५६. दीर ५८. रूपेरी ५९. निरर्थक ६१. षडानन ६२. कुत्रे पीठ खाते ६३. टाप ६४. सुत ६५. माज ६७. महाग ७०. तिढा ७२. नड ७३. तनया ७५. राजा ७७. गर्व ७९. वरकड ८०. वीतराग ८२. नर्मदा ८३. बुरसटलेला ८४. उमा ८५. शीर्षासन ८६. तड ८९. खापर ९०. रस्ता ९२. मास ९४. डकली ९५. आव ९६. वश ९७. राजमा ९८. तार १००. करूण १०१. लळा १०२. स्थूल १०३. काका १०४. कटू १०५. वर्ण १०६. गोठा

# अजितदादांच्या निधनानंतर अरोरा कुठे गेले?

पान १ वरून

या चर्चेतील मुख्य व लक्ष नसलेले एक पात्र म्हणजे डिझाईन बॉक्सवाला गडी नरेश अरोरा. आता पुढील काळ निवडणुका नसल्याने अरोराचे पक्षातील काम संपले असले तरी काही गोष्टी अजित पवार यांच्यावर जीव ओवाळून टाकणाऱ्या जनतेला माहीत असाव्यात म्हणून हा शब्दप्रपंच. राष्ट्रवादीतील सध्या निवडून आलेल्या आमदारांना तिकीट देऊ नये म्हणून चुकीचे सर्वेक्षण करून अरोरा यांनी अजित पवारांना दिले. मात्र अजित पवार यांनी त्यांचा सल्ला मानला नाही. त्यांनी त्यांनाच उमेदवारी दिली, ज्यांच्या विजयाबद्दल त्यांना विश्वास होता. ते उमेदवार ५० हजारहून अधिक मताधिक्क्याने निवडून आले. डिझाईन बॉक्सच्या सर्वेक्षणाला न जुमानता अजित पवार यांनी स्वतःच्या यंत्रणेमार्फत आढावा घेऊन तिकीटे दिली. ही माहिती पक्षातील अनेक आमदारांना आहे. विधानसभा आणि इतर निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेल्या यशाचे संपूर्ण श्रेय अजित पवार यांनाच जाते. यामागे दुसऱ्या कोणाचेही काडीमात्र योगदान नव्हते. अजित पवार यांना निवडणुका जिंकण्यासाठी अवाजवी घोषणा करण्याचा सल्ला नरेश अरोरा देत होते.मात्र अजित पवार यांनी त्यांना वेळोवेळी स्पष्ट शब्दात नकार दिला.मी जे करू शकतो तेच लोकांसमोर बोलणार,असे अजित पवार यांनी अरोरा यांना बजावून सांगितले होते.आपल्या बोलण्याप्रमाणे वागत अजित पवार यांनी कधीही अवाजवी घोषणा दिल्या नाहीत. शरद पवारांवर टीका करा, अशा सूचनाही अरोरा द्यायचे. मात्र अजित पवार यांनी ते कधीच मानले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जोरावर अरोराने एक विमान कंपनी स्थापन केल्याचे ऐकिवात आहे.

पक्षातील एखादा आमदार नरेश अरोरांना भेटत नाही, त्यांना ओळखत नाही किंवा नमस्कार करत नाही, या कारणांवरून त्या आमदाराविषयी चुकीची माहिती अरोरा अजित पवारांना देत असत. सुरुवातीला ते पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करत असावेत असे अजित पवारांना वाटले. त्यामुळे अरोरांच्या सांगण्यावरून अजित पवार यांनी काही आमदारांना झापले. पण नंतर त्या आमदाराने अरोरांशी संबंध सुधारल्यावर त्याच्याविषयी त्यांचा अहवाल चांगला येऊ लागला. निवडणुकीत अजित पवार जास्त जागा लढवण्याच्या तयारीत असताना या अरोरांनी त्यांना कमी जागा लढवण्याचा, सेना-भाजपासमोर उमेदवार न देण्याचा सल्ला दिला. तसेच अजित पवार यांच्या काही सभा त्यांच्या सांगण्यावरून रद्द करण्यात आल्या. अरोरांची चलाखी अजित पवार यांनी ओळखली होती. पण ऐन निवडणुकीत नवीन प्रचार यंत्रणा उभी करणे योग्य ठरणार नाही म्हणून त्यांनी अरोरांकडे दुर्लक्ष केले.पत्रके वाटणे, बॅनर लावणे आणि वातावरण निर्मिती करण्याच्या नावाखाली अरोराने पक्षाकडून आर्थिक लाभ घेतले. मात्र प्रत्यक्षात काहीच काम झाले नाही, असे मिटकरी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे.

# भोंदूबाबा खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

पान १ वरून

आले होते. उद्या त्याला दुसऱ्या गुन्ह्यात पुन्हा न्यायालयात हजर करणार आहेत.

न्यायाधीश श्रीमती बी. इन. ईचपुरानी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी तपास अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी आणि सरकारी वकील शैलेंद्र बागडे उपस्थित होते. न्यायालयाने प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अवघ्या पाच मिनिटांत निर्णय देत खरातला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले. त्यानंतर खरातला वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याची रवानगी नाशिक मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली. या प्रकरणात विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने न्यायालयीन कोठडी दिली. या प्रकरणातील पहिल्या गुन्ह्यात यापूर्वी खरातला तीन वेळा पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. अशोक खरातविरोधात लैंगिक अत्याचार, आर्थिक फसवणूक आदी गंभीर गुन्ह्यांच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. आतापर्यंत आठ महिलांनी तक्रारी दाखल केल्या असून त्याच्यावर ११ गुन्हे नोंद आहेत. पहिल्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मिळाली असली तरी खरातचा कारागृहातील मुक्काम वाढण्याची शक्यता आहे. आता उद्या त्याला दुसऱ्या गुन्ह्याच्या सुनावणीसाठी पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. त्यामुळे पुढे त्याला पुन्हा पोलीस कोठडी मिळते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# इराण युद्धातून डोनाल्ड ट्रम्प माघार घेतील का?

पान १ वरून

जबाब दिला. होर्मुझ खुले करण्यासाठी ट्रम्प यांनी इराणला वारंवार धमक्या दिल्या. परंतु इराण या धमक्यांनी बधला नाही. निर्वाणीचा इशारा म्हणून ट्रम्प यांनी शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्या २१ युद्धनौकांनी इराणला घेरण्याचा प्रयत्न केला. इराणमध्ये सैनिक उतरवून जमिनीवरील युद्ध छेडण्याची धमकी दिली. त्याला इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डने (आयआरजीसी) जशास तसे उत्तर दिले. तुम्ही आमच्या देशात या आम्ही तुमची वाट पहात आहोत, असा जबरदस्त पलटवार आयआरजीसीने केला. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत झुकणार नाही, हे पाहताच ट्रम्प यांचे अवसान गळाले आहे. युद्धावर आधीच अब्जावधी डॉलर खर्च झाले आहेत. त्यावरून अमेरिकेतील विरोधी पक्ष डेमॉक्रेटीक पार्टी ट्रम्प यांच्यावर सातत्याने टीका करत आहे. अमेरिकन जनता ट्रम्प यांच्या युद्धखोरीच्या विरोधात रस्त्यावर उतरत आहे. युद्धामुळे महागाई वाढली. यामुळे ट्रम्प आता युद्धबंदी जाहीर करण्यासाठी सन्मानकारक मार्ग शोधत आहेत. होर्मुज ताब्यात घेणे याला आम्ही प्राधान्य देत नाही. आम्ही आधीपासून सांगत आहोत की हे युद्ध चार ते सहा आठवड्यात संपेल अशी भाषा स्वतः ट्रम्प, माध्यम सचिव लेव्हिट आणि अमेरिकेच्या अन्य काही नेत्यांनी गेले काही दिवस सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर उद्या ट्रम्प नेमकी काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. ट्रम्प हे इराण युद्ध संपले म्हणून जाहीर करतात की अमेरिकी सैनिकांना माघारी बोलावतात, होर्मुजमध्ये आम्हाला रस नाही म्हणतात की थेट क्युबावर हल्ल्याची गोष्ट करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# ओरॅकलने ३०,००० कर्मचारी झटक्यात काढले

पान १ वरून

संगणकीय व्यवसायाच्या विविध विभागांमध्ये करण्यात आली असून त्याचा सर्वाधिक फटका भारत आणि मेक्सिकोतील कर्मचाऱ्यांना बसला आहे. कंपनीने अधिकृतपणे आकडे जाहीर केले नसले तरी जागतिक स्तरावर हा आकडा सुमारे ३०,००० म्हणजेच कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १८ टक्के इतका असल्याचा अंदाज आहे. तर भारतातील सुमारे ३०,००० कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १२,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले आहे.

या नोकरकपातीसंदर्भात 'ओरॅकल'ने कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्वकल्पना दिली नव्हती. स्थानिक स्तरावरील मॅनेजरनाही याची काहीच कल्पना नव्हती. भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी पाच ते सहा वाजण्याच्या सुमारास अनेकांना थेट कंपनीच्या ऑनलाईन सिस्टीममधून बाहेर काढण्यात आले. अनेकांनी सिस्टीममधील बॅकएण्ड लॉगइन करता येत नव्हते. त्यावेळी मेल तपासला असता कंपनीने नोकरीवरुन काढून टाकल्याचे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. ओरॅकल लीडरशिप'कडून पाठवलेल्या ईमेलमध्ये म्हटलं आहे की, एका व्यापक संघटनात्मक बदलाचा भाग म्हणून काही पदे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळेच हा तुमच्या कामाचा शेवटचा दिवस आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतप्त भावना असून एक कर्मचार्याने एक्सवर लिहिले की, ओरॅकल मधील एका वरिष्ठ व्यवस्थापक मित्राचा फोन आला. २० जणांच्या टीममधील ६ जणांना कामावरून काढण्यात आले. अनेक टीममध्ये जवळपास ५० टक्के कर्मचारी कमी करण्यात आले आहेत. एकूण कपात सुमारे २० टक्के आहे. काही कर्मचाऱ्यांनी सांगितले की, पहाटे ५ वाजता ईमेल आला आणि २० वर्षांची सेवा एका क्षणात संपली. तर दुसऱ्याने लिहिले की, मलाही काढण्यात आले. पुढच्या महिन्यात मला चार वर्षे पूर्ण होणार होती.

# अमेरिकेच्या १८ कंपन्यांवर इराणकडून हल्ले सुरू

पान १ वरून - ड्रोन हल्ला केला. या इमारतीत बॅटेल्को या दळणवळण क्षेत्रातील दिग्गज कंपनीचेही कार्यालय आहे. हल्ल्यात ॲमेझॉनच्या कार्यालयाची प्रचंड हानी झाली असून कामकाज ठप्प झाले. इराणने अमेरिकेच्या १८ कंपन्यांची यादी जाहीर केली होती. त्यामध्ये ॲमेझॉनसह टेस्ला, डेल, मेटा, आयबीएम, हेवलेट पॅकार्ड, ओरॅकल, गुगल, पल, मायक्रोसॉफ्ट आदि कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांवर हल्ल्याची धमकी दिल्याने अमेरिकेत खळबळ माजली आहे.

# आर्थिक वर्षाची उत्साही सुरुवात

पान ८ वरून - आली. जागतिक बाजारांतील सकारात्मक संकेत आणि गुंतवणुकदारांनी दाखवलेल्या खरेदीच्या उत्साहामुळे बाजाराने आज मोठी मजल मारली. आजच्या तेजीमध्ये प्रामुख्याने किरकोळ व्यापार आणि वित्तीय क्षेत्रातील समभागांनी आघाडी घेतली. सोमवारी झालेल्या मोठ्या पडझडीतून आज बाजार बऱ्यापैकी सावरला. सोमवारी सेन्सेक्स १,६३५.६७ अंकानी कोसळून ७१,९४७ अंकांवर बंद झाला होता. ती पडझड आजच्या तेजीने भरून काढली.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील २५१, पाली हिल, नर्गिस दत्त मार्ग, वांद्रे पश्चिम, मुंबई - ४०००५०, सीटीएस क्र. सी/११४८, गाव - वांद्रे सी, तालुका - अंधेरी, एमएसडी येथे स्थित कोझिहोम सीएचएसएल या संस्थेमधील ८ वा मजला, ए-ब्लॉक, "कोझिहोम" वरील सदनिका क्र. ए-८२, मोजमाप ६२५ चौफू क्षेत्रफळ, व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ६३ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्रमांक "३११" ते "३१५" (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकीचे ५ पूर्णतः भरणा केलेले समभाग श्री. प्रितपाल सिंग बात्रा यांच्याकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागावर विनिमय दर, भाडेपट्टी, धारणाधिकार, वारसा, देखभाल, ताबा, भेट, न्यास या मार्गे किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही स्वरुपात कोणताही हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, हितसंबंध आणि/किंवा सुखाधिकार असल्यास, त्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये संबंधित सहाय्यक दस्तऐवज सोबत जोडून, निम्नस्वाक्षरीकार यांना लिखित स्वरुपात सूचित करावे. सूचनेच्या उपरोल्लेखित कालावधीनंतर प्राप्त झालेला कोणताही दावा, सोडून दिला असे समजण्यात येईल आणि असा कोणताही दावा विचारात न घेता व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०२.०४.२०२६

सही/-
शहझाद राधनपुरा - ॲडव्होकेट,
२१, राजन व्हिलेज रोड, १ला मजला,
सदनिका क्र. ६, ऑफ कार्टर रोड,
वांद्रे पश्चिम, मुंबई - ४०००५०.
ईमेल: advocateshahzad1@gmail.com
मोबा.: ९९३०४६८४२८

**TENDER NOTICE**

Sealed tenders are invited from Reputed Developers for **Redevelopment** of

**KHANDWALA SHOPPING CENTRE CHSL.**

Daftary Road, Malad East, Mumbai- 400097
Plot area as per PRC: 985.31sqm
Residential unit-08, Commercial unit-18

**AIRRISES CONSULTING (HI-TECH CONSULTING ENGINEERS INDIA PVT LTD)**

179, Vmall, Western Express Highway, Thakur Complex, Kandivali-East, Mumbai-400101.
Tender Mode:
Online Collection & online submission only.
Mode of purchase online only
Tender Cost Rs.50,000+GST Online (Non-Refundable)
Tender Availability:
02-04-2026 to 09-04-2026
Last date Submission Online by
09-05-2026 by 5:00 pm

Link: https://crm.airrises.com/t/9

**आयबीसी, २०१६ अन्वये ई-लिलाव विक्री सूचना**
**मे. गुप्ता सिंथेटिक्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
परिसमापकाचे कार्यालयः ३०१, ३रा मजला, सौरभ बिल्डींग, डोमिनोज पिझ्झा समोर, चकाला, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए आणि अनुसूची I अन्वये मे. गुप्ता सिंथेटिक्स (परिसमापनामध्ये)च्या खालील संपत्तीची विक्रीकरिता ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com द्वारे बोली आमंत्रित करण्यात येत आहेत.

| परिसमापन विनियमनांच्या विनियमन ३७ए आणि अनुसूची १ अन्वये विक्री करावयाच्या संपत्तीचे तपशील | विक्रीची पद्धत | (रु. राखीव किंमत) | ईएमडी (रु.) | विस्तारयोग्य बोली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| I. प्रतिभूती आणि वित्तीय संपत्ती (एसएफए) | आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ ए आणि अनुसूची १ अन्वये तात्काळ वसूल न करता येणाऱ्या मालमत्ता | ५२९,००० | ५२,९०० | १०,००० |
| ईएमडी जमा करण्याचा अंतिम दिनांक (विस्तार समाविष्ट) | दि. २९.०४.२०२६ | | | |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | दि. ०२.०५.२०२६ (स. १०.०० ते दु. १२.००) | | | |

१. इच्छुक अर्जदार https://ibbi.baanknet.com येथे उपलब्ध असलेल्या ऑनलाईन ई-लिलावाच्या तपशिलवार अटी आणि शर्ती, बोली अर्ज, पात्रता निकष, बोलीदारांद्वारे उद्घोषणा, ईएमडी आवश्यकता इ. करिता ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवज पाहू शकतात.
२. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची हमी समाविष्ट असलेले आवश्यक दस्तऐवज बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com द्वारे सादर करावे.
३. संभाव्य बोलीदारांनी बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com द्वारे इसारा रक्कम अनामत (ईएमडी) जमा करावी.
४. वरील खंड २मध्ये उल्लेखिलेल्या हमीपत्रामध्ये असा उल्लेख करावयास हवा की, संभाव्य बोलीदार लागू असलेल्या मर्यादेपर्यंत संकेताच्या कलम २९अ अंतर्गत कोणत्याही अपात्रतेचा सामना करावा *लागत नाही. संभाव्य बोलीदारांनी हे लक्षात ठेवावे की, कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, परिपत्रक क्रमांक आयबीबीआय/एलआयक्यू/८४/२०२५ दिनांक २८ मार्च २०२५ नुसार आयबीबीआयनुसार ईएमडी जप्त करण्यात येईल.*
५. कृपया लक्षात ठेवा की ईएमडी पेमेंट ई-वॉलेटमध्ये निधी जोडून आणि संबंधित लिलावासाठी "सहभागी व्हा" वर क्लिक करून बँकनेट पोर्टलद्वारे करावे लागेल. पात्र बोलीदारांची नावे ओळखली जातील आणि www.baanknet.com या पोर्टलवर ऑनलाईन लिलावात सहभागी होण्यासाठी परिसमापकाद्वारे कळविण्यात येतील. इच्छुक बोलीदाराने लिलाव पोर्टलमध्ये त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड तयार करावा आणि त्यांची ईएमडी रक्कम पोर्टलच्या ई-वॉलेटमध्ये जमा करावी. लिलाव पोर्टलबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी, बँकनेट (बँक ॲसेट ऑक्शन नेटवर्क), ईमेल आयडी support.baanknet@psballiance.com, मोबाईल क्रमांकः +९१ ८२९१२२०२२० वर संपर्क साधा.
६. यशस्वी बोलीदाराला देय व्याजासह शिल्लक विक्री मोबदला प्रदान करण्याकरिता (म्हणजेच, प्राप्त ईएमडीच्या सेट-ऑफ/समायोजनानंतर स्वीकृत बोली रक्कम आणि इतर लागू कर/शुल्क) एलओआयच्या दिनांकापासून जास्तीत जास्त ९० दिवसांचा कालावधी दिला जातो.
७. असे स्पष्ट करण्यात येते की, सदर आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याकरिता आहे आणि परिसमापक किंवा कंपनीकडून विक्री करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. परिसमापकाला परिसमापन प्रक्रियेच्या हितासाठी त्याच्या विवेकबुद्धीनुसार कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न देता ई-लिलावाच्या वेळेसह कोणत्याही किंवा अटी आणि शर्ती वाढवण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा आणि/किंवा सुधारित करण्याचा, हटवण्याचा अधिकार आहे आणि लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही बोली मंजूर करण्याचा अधिकार आहे.
८. ई-लिलाव **फक्त "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्त्वावर** आयोजित करण्यात येईल.

दिनांकः ०२.०४.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/-
श्रीमती जोविता रीमा मथियास
परिसमापक - गुप्ता सिंथेटिक्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)
आयबीबीआय नोंद. क्र. IBBI/IPA-002/IP-N00337/2017-18/10941
पत्ताः ३०१, ३रा मजला, सौरभ बिल्डींग, डोमिनोज पिझ्झा समोर, चकाला, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.

**ई-लिलाव विक्री सूचना**
**नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत**
**सी. महेंद्र एक्सपोर्ट्स लिमिटेड - परिसमापनात**
नोंदणीकृत कार्यालयः टॉवर 'सी', कार्यालय क्र.सीसी-६०११, भारत डायमंड बोर्स, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

सी. महेंद्र एक्सपोर्ट्स लिमिटेड (परिसमापनात) च्या मालमत्तेची ई-लिलाव विक्री जसे आहे **जेथे आहे, जसे आहे जे आहे, जे काही उपलब्ध आहे आणि कोणत्याही दाव्याशिवाय** या तत्त्वावर केली जाईल.
**ई-लिलावाची तारीख आणि वेळ: गुरुवार, २३ एप्रिल, २०२६, स.११:३० वा. ते दु.१२:३० वा. पर्यंत**

| ब्लॉक | मालमत्ता | आरक्षित मूल्य (रू.) | इसारा रक्कम ठेव (इरठे) (रू.) | बोली वाढीव रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १. | प्लॉट क्र.२६/९-ए आणि ए/२६/१०, उधना उद्योगनगर सहकारी संघ लिमिटेड, उधना, सुरत-३९४२१०, गुजरात येथे स्थित जमीन, इमारत, तसेच विविध यंत्र व सामग्री (जमिनीचे क्षेत्रफळ १२९६ चौ.मी.; इमारतीचे क्षेत्रफळ २४,१८३ चौ.फूट). | ७,००,००,००० | ७०,००,००० | ७,००,००० |
| २. | नापीक जमीन, सर्व्हे क्र.४७४ व ४७६ गाव तिसंगी येथे असलेली अर्धवट जिरायत व सडा-पड जमीन: जी कवठे महाणकर, जिल्हा: सांगली ४१६४०५, महाराष्ट्र येथे स्थित (सर्व्हे क्र.४७४-५,९०० चौ. मी. आणि सर्व्हे क्र.४७६-२२०० चौ.मी.) | १३,३२,००० | १,३३,२०० | १,००,००० |
| ३. | महसूल सर्व्हे क्र.२८६/पी, गाव शिंदोडी मोती, तालुका अब्दासा, जिल्हा येथे भाडेपट्ट्याने जमीन; कच्छ-भुज, गुजरात ३७०६४५. मोजमाप १०,००० चौ.मी. | १,४४,३४२ | १४,४३४ | १०,००० |
| ४. | सी. महेंद्र इंटरनॅशनल लिमिटेडचे इक्विटी शेअर्स (प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याचे, पूर्णपणे भरणा केलेले १,१२,८०० इक्विटी शेअर्स) | १०,००,००,००० | १,००,००,००० | १०,००,००० |

**ई-लिलावाचे नियम आणि अटी खालीलप्रमाणे आहेत:**
१. ई-लिलावाची विक्री बान्कनेट द्वारे, https://ibbi.baanknet.com **(लिलाव पोर्टल)** या वेबसाईटद्वारे केली जाईल.
२. इच्छुक बोलीदारांनी आपली इसारा रक्कम ठेव **(इरठे)** लिलाव पोर्टलद्वारे, २२ एप्रिल २०२६ रोजी सायं.६:०० वा. पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक कागदपत्रे, ज्यात नादारी आणि दिवाळखोरी संहिता कलम २९ए अंतर्गत पात्रतेच्या घोषणेचा समावेश आहे, केवळ लिलाव पोर्टलद्वारे सादर करावीत. प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी अपात्र आढळल्यास, सर्वाधिक बोली लावणाऱ्या बोलीदाराची इरठे जप्त केली जाईल.
४. मालमत्ता आणि लिलावाशी संबंधित सर्व अटी, शर्ती आणि माहिती प्रक्रिया ज्ञापन मध्ये दिली आहे आणि ती लिलाव पोर्टलवर उपलब्ध आहे. माहिती/डेटा रूमसाठीची विनंती cirpcmel@gmail.com या ईमेल आयडीद्वारे पाठवावी लागेल.
५. इच्छुक बोलीदारांनी केवळ लिलाव पोर्टलद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून नोंदणी करावी, आपली पात्रता कागदपत्रे अपलोड करावीत, बोली लावावी आणि आपल्या बोलीची पुष्टी प्राप्त करावी.
६. परिसमापकाला कोणताही लिलाव स्वीकारण्याचा, नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा किंवा प्रक्रिया ज्ञापन/ई-लिलावाच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता बदल करण्याचा अधिकार राखीव आहे. परिसमापकाला कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता ई-लिलाव रद्द करण्याचा अधिकार देखील राखीव आहे.

**दिनांक: ०२ एप्रिल २०२६**
**ठिकाण: मुंबई**

**सही/-**
**कृष्णा चामडिया**
**परिसमापक - सी. महेंद्र एक्सपोर्ट्स लिमिटेड**
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00694/2017-18/11220

**जाहीर सूचना**

मुंबई येथील न्यायपालिकेच्या माननीय उच्च न्यायालयाच्या न्यायालय कक्ष क्र. ३४ चे पीठासीन माननीय श्री. न्यायमूर्ती मिलिंद जाधव (सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र) यांनी दिनांक १८.०२.२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे, याचिकाकर्ता, **पूनावाला फिनकॉर्प लिमिटेड (याचिकाकर्ता क्र. १) आणि अरविंद कपिल (याचिकाकर्ता क्र. २)** यांना प्रतिवादी, **मॅक्सिस लोबो (प्रतिवादी क्र. १), जॉन डो (प्रतिवादी क्र. २), गुगल एलएलसी (प्रतिवादी क्र. ३), इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (प्रतिवादी क्र. ४), एक्स कम्युनिकेशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (प्रतिवादी क्र. ५) आणि मदनलाल दहरिया (प्रतिवादी क्र. ६)** यांना सदर प्रसिद्धीमार्गे पर्यायी सेवा देण्याकरिता परवानगी दिली आहे.

याचिकाकर्ता यांनी इतर बाबींसोबत, प्रतिवादींविरुद्ध याचिकाकर्ता, याचिकाकर्ता क्र. १चे अध्यक्ष, आणि याचिकाकर्ता क्र. १ च्या वरिष्ठ व्यवस्थापनाशी संबंधित खोट्या, बदनामीकारक आणि अपमानकारक ईमेल्स, ऑनलाईन लेख आणि समाजमाध्यमांवरील पोस्ट्सच्या प्रसार आणि प्रसिद्धीमुळे उद्भवणाऱ्या बदनामी, मनाई हुकूम आणि नुकसानभरपाईचा दिलासा मिळण्याकरिता मुंबई येथील माननीय न्यायपालिकेच्या उच्च न्यायालयासमक्ष **दावा क्र. १० वर्ष २०२६** दाखल केला आहे.

उपरोल्लेखित प्रतिवादी यांना याद्वारे **मुंबई येथील माननीय न्यायपालिकेच्या उच्च न्यायालयासमक्ष दि. २२.०४.२०२६** रोजी स. ११.०० वा. किंवा त्यानंतर लगेचच, वरील खटल्यामधील दाव्यास उत्तर देण्याकरिता उपस्थित राहण्यास सांगण्यात येत आहे, असे न केल्यास याचिकाकर्ता एकतर्फी प्रक्रिया करण्यास आणि कायद्यानुसार डिक्री प्राप्त करण्यास पात्र असेल.

सदर जाहीर सूचना माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पारित करण्यात येत आहे.

**व्हाईट ॲण्ड ब्रिफ ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स**
याचिकाकर्त्यांकरिता ॲडव्होकेट्स

नवाकाळ

• मुंबई | गुरुवार २ एप्रिल, २०२६ • पान -८

## दैवी चमत्काराने महापौर तावडेंचा आवाज फुटला



मुंबई - राज्यात अंधश्रद्धा आणि भोंदूबाबा प्रकरणांवरून चर्चा सुरू असतानाच मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या वक्तव्यामुळे नवी खळबळ उडाली आहे. बोरिवली येथे झालेल्या एका धार्मिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी गुरुदेवांच्या आशीर्वादाने घशाचा त्रास बरा झाला' असा दावा केला. रितू तावडे म्हणाल्या की, गेल्या दीड-दोन वर्षांपासून मी घशाच्या समस्येने त्रस्त होते. आवाज नीट निघत नव्हता. मी औषधं घेत होते, पण त्याने काहीच फरक पडत नव्हता. हे मी गुरुदेवजींना सांगितले तेव्हा त्यांनी मला आशीर्वाद दिला आणि आज मी स्पष्ट बोलू शकत आहे. हा मोठा चमत्कार आहे. मला खूपच सकारात्मक ऊर्जा अनुभवायला मिळत आहे. त्यानंतर त्यांच्यावर टीका झाली. यावरून त्यांनी स्पष्टीकरण दिले की, गुरुजींनी मला ॐ चा उच्चार शिकवला. ही माझी अंधश्रद्धा नसून श्रद्धा आहे.

## ताराराणींचे 'धर्मांतर' करणाऱ्या जैन मुनींवर कारवाई का नाही?

**संजय राऊत यांचा सवाल**

■ मुंबई

**जैन मुनी** नयन पद्मसागर महाराज यांनी काल एका जाहीर व्याख्यानात मराठा घराण्यातील शूरवीर ताराराणी या जैन धर्मिय होत्या, असा दावा केला. या मुद्यावरून उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह तमाम मराठा संघटनांना धारेवर धरले. ताराराणींचे असे परस्पर धर्मांतर करणाऱ्या जैन मुनींवर कारवाई का केली नाही,असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या, क्षत्रिय कुळात जन्मलेल्या शूरवीर ताराराणी यांना कोण कुठला जैन मुनी जैन धर्मिय ठरवतो आणि सारे मराठे हा अपमान मुकाट्याने सहन करतात हे दुर्दैवी आहे. ताराराणींसारख्या महान व्यक्तिमत्वाबद्दल अशी परस्पर विधाने करण्याचा अधिकार या जैन मुनींना कोणी दिला, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार जे स्वतः मराठा समाजातील आहेत,ते गप्प का बसले आहेत, मराठा आरक्षणासाठी जीवाची बाजी लावणारे मनोज जरांगे कुठे गायब आहेत, मराठा समाजासाठी कार्य करणाऱ्या मराठा संघटना कुठे गेल्या आहेत,अशा सवालांच्या फैरी राऊत यांनी झाडल्या.

जैन धर्मियांची विकृती आता एवढ्या थराला पोहोचली आहे की ताराराणींचे धर्मांतर करण्याची हिंमत त्यांना झाली. हे फार मोठे षडयंत्र आहे.

## लाडक्या बहिणींना मोठा दिलासा 'ई-केवायसी'ला पुन्हा मुदतवाढ

■ मुंबई

**राज्यातील** महिलांसाठी महत्त्वाची असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी योजनेतील ई-केवायसी दुरुस्तीच्या अंतिम मुदतीत पुन्हा वाढ केल्याची घोषणा आज केली. याआधी ३१ मार्च ही अंतिम तारीख होती. आता ती ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. आदिती तटकरे याबाबत म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार ही मुदतवाढ करण्यात आली आहे. या निर्णयामागील उद्देश म्हणजे राज्यातील जास्तीत जास्त महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि तांत्रिक कारणांमुळे कोणीही वंचित राहू नये हा आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून राज्यात सुरू आहे.

## ईडीच्या याचिकेवर दिल्ली हायकोर्टाने अरविंद केजरीवालांकडून उत्तर मागवले

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांना पीएमएलए समन्स प्रकरणातील निर्दोष मुक्ततेविरोधात ईडीच्या याचिकेवर उत्तर देण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी होणार आहे.

आज ईडीने दाखल केलेल्या अपीलावर अरविंद केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाने नोटीस बजावली. हे अपील एक्साईज पॉलिसी प्रकरणात ईडीच्या समन्सचे पालन न केल्याबाबत ट्रायल कोर्टाने दिलेल्या निर्दोष



मुक्ततेविरोधात दाखल करण्यात आले आहे.

न्यायमूर्ती स्वराणा कांता शर्मा यांनी नमूद केले की, याचिकेची पूर्वसूचना देऊनही केजरीवाल यांच्या वतीने कोणीही न्यायालयात हजर झाले नाही. त्यामुळे न्यायालयाने नोटीस जारी करत प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी निश्चित केली. ईडीच्या वतीने ॲडव्होकेट जोहेब हुसेन यांनी हजर राहून ट्रायल कोर्टाचा आदेश चुकीचा असल्याचे सांगितले. राऊस ॲव्हेन्यू न्यायालयातील अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी परस दलाल यांनी जानेवारी महिन्यात या प्रकरणात केजरीवाल यांची निर्दोष मुक्तता केली होती.

## अनिल अंबानींविरोधात सीबीआयचा नवा गुन्हा



■ नवी दिल्ली

**चुकीची** माहिती देणारे डिबेंचर्स आणि निधीचा अपहार करून भारतीय आयुर्विमा महामंडळाची (एलआयसी) ३,७५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सीबीआयने अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) यांच्या विरोधात नवीन गुन्हा दाखल केला आहे.

सीबीआयने १ एप्रिल २०२६ रोजी अनिल अंबानी, रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि अज्ञात सरकारी अधिकाऱ्यांविरोधात एफआयआर नोंदवला. एलआयसीने दाखल केलेल्या तक्रारीनुसार, आरकॉमने एलआयसीला ४,५०० कोटी रुपयांच्या नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सची खरेदी करण्यासाठी फसवणुकीने प्रवृत्त केले. याशिवाय आरकॉम व्यवस्थापनाने कंपनीच्या आर्थिक स्थैर्याबद्दल आणि एलआयसीकडे तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या वास्तव मूल्याबद्दल खोटी माहिती दिली. सीबीआयने यापूर्वी कथित बँक फसवणुकीप्रकरणी रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि अनिल अंबानी यांच्या विरोधात तीन गुन्हे दाखल केले आहेत. सीबीआयने अनिल अंबानी यांची दोनदा चौकशी केली आहे. ईडीही वेगवेगळ्या प्रकरणात आरकॉम आणि अनिल अंबानी यांची चौकशी करत आहे.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाकडून अक्षय कर्डिले रिंगणात

■ अहिल्यानगर

**अहिल्यानगरमधील** राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी भाजपाने उमेदवार जाहीर केला असून, दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचा मुलगा अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. त्यांचे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. त्यानंतर राहुरी मतदारसंघात पोटनिवडणूक होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. अक्षय कर्डिले हे सध्या भाजपा युवा मोर्चाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष आहेत. वडिलांच्या निधनानंतर त्यांनी शिव निर्धार यात्रा काढून मतदारसंघात जनसंपर्क वाढवण्यास सुरुवात केली. आता पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून प्राजक्त तनपुरे यांना उमेदवारी दिली जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



उमेदवारी न मिळाल्यास तनपुरे अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची शक्यता त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. सध्या कर्डिले आणि तनपुरे या दोघांनीही मतदारसंघात सक्रिय जनसंपर्क मोहीम सुरू केली आहे. विविध गावांमध्ये भेटीगाठी, कार्यकर्ता मेळावे आणि स्थानिक नेत्यांशी संवाद साधत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## खरातच्या मुलीच्या नावावर कोट्यवधीचा आलिशान फ्लॅट

■ पुणे

**नाशिकमधील** कथित भोंदूबाबा अशोक खरातच्या मालमत्तेबाबत नवनवे खुलासे होत असून, त्याच्या कुटुंबियांच्या नावावरही मोठ्या प्रमाणात संपत्ती असल्याचे उघड होत आहे. पुण्यातील मॉडेल कॉलनी परिसरातील एका आलिशान इमारतीत खरातच्या मुलीच्या नावावर ३ बीएचके फ्लॅट आहे. २४ रत्नम या उच्चभ्रू सोसायटीतील सातव्या मजल्यावर सुमारे १०५५ चौरस फुटांचा हा फ्लॅट १३ सप्टेंबर २०२३ रोजी खरेदी करण्यात आला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या व्यवहारात सुमारे १ कोटी २० लाख रुपये रोख स्वरूपात देण्यात आल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे खरेदी खतामध्ये धनादेशाद्वारे व्यवहाराचा उल्लेख नसल्याचेही सांगितले जात आहे. यापूर्वी खरातचा सीए पोफळे यांच्या माध्यमातून कोरेगाव पार्क परिसरात ४९ गुंठे जागेवर तब्बल १८ रो-हाऊस त्यांच्या पत्नीच्या नावावर असल्याचेही उघड झाले होते.

## मराठी शाळा वाचवा! नवी मुंबईमध्ये मनसे-उबाठा नगरसेवकांचे आंदोलन

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या ८१ शाळा इंग्रजी माध्यमात रुपांतरित करण्याच्या प्रस्तावावरून शहरात राजकीय वातावरण तापले आहे. या निर्णयाला विरोध करत मनसे आणि उबाठा नगरसेवकांनी आज महापालिकेत जोरदार आंदोलन केले.

आज महासभेत प्रवेश करताना मनसे आणि उबाठाच्या नगरसेवकांनी हातात बॅनर घेत जोरदार घोषणाबाजी केली. सत्ताधारी भाजपाकडून मराठी शाळा बंद करून इंग्रजी माध्यम सुरू करण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप करत

**शहरात राजकीय वातावरण तापले**

आंदोलकांनी निषेध व्यक्त केला. या आंदोलनात मनसेचे नगरसेवक अभिजित देसाई तसेच उबाठाचे नगरसेवक विशाल ससाणे आणि विशाल विचारे सहभागी झाले होते. नगरसेवकांनी सांगितले की, सरसकट सर्व मराठी शाळा बंद करून इंग्रजी माध्यम सुरू करण्यास विरोध आहे. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे, तिथे प्रायोगिक तत्त्वावर इंग्रजी माध्यम सुरू करण्याचा विचार करता येईल, मात्र चांगल्या चालू असलेल्या मराठी शाळा बंद करणे योग्य नाही इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करून त्या खाजगी संस्थांकडे सोपवण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे.

## उमरकांचनमध्ये शेतकऱ्याचा विजेचा शॉक लागून मृत्यू

■ ढेबेवाडी

**शेतातील** करंजीच्या झाडांच्या फांद्या तोडत असताना वीजवाहक तारांचा शॉक लागून एका ५६ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना पाटण तालुक्यातील ढेबेवाडी खोऱ्यातील उमरकांचन येथे घडली.

या घटनेतील मृत शेतकऱ्याचे नाव आनंदा विष्णू मोहिते (५६) असे आहे. आनंदा मोहिते हे काल दुपारी उमरकांचन येथील त्यांच्या पानंदिवली नावाच्या शिवारातील शेतामध्ये करंजीच्या झाडाच्या फांद्या तोडण्यासाठी गेले होते. त्यावेळी या झाडावर फांद्या तोडत असताना तुटलेली फांदी ३३ केव्ही विद्युत प्रवाह असणाऱ्या तारेमध्ये अडकली. त्यावेळी जोराचा शॉक लागून आनंदा मोहिते यांचा जागीच मृत्यू झाला. दादाराम मोहिते यांनी ढेबेवाडी पोलीस ठाण्यात या घटनेची फिर्याद दाखल केली आहे. आनंदा मोहीते यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

## हुंडाबळी वैष्णवी हगवणे प्रकरणातील जालिंदर सुपेकरला गृहविभागाची क्लीनचिट

■ पुणे

**राज्यभर** चर्चेत असलेल्या वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात चर्चेत आलेल्या शस्त्रपरवाना प्रकरणात पुणे शहर पोलीस दलातील वरिष्ठ आयपीएस अधिकारी अमिताभ गुप्ता आणि जालिंदर सुपेकरला अखेर क्लीनचिट मिळाली आहे. गृहविभागाने चौकशीअंती कोणताही गैरप्रकार आढळला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात जालिंदर सुपेकरने आपल्या भाच्यांना (वैष्णवी हगवणेचा नवरा आणि दीर) शस्त्रपरवाना मिळवून देण्यासाठी पदाचा गैरवापर केल्याचा आरोप



करण्यात आला होता. या आरोपांनंतर त्याची विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) पदावरून गृहरक्षक दलात बदली करण्यात आली होती. सखोल चौकशीनंतर हे आरोप फेटाळण्यात आले आहेत. गृहविभागाच्या अहवालानुसार, पुणे पोलीस दलाच्या कार्यकाळात देण्यात आलेले सर्व ४३३ शस्त्रपरवाने हे शस्त्र अधिनियम १९५९ आणि शस्त्र नियम २०१६ नुसारच देण्यात आले होते. त्यामुळे या प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीतही कोणताही गैरव्यवहार आढळलेला नाही.

## लक्ष्मी ऑरगॅनिकविरोधात ६ एप्रिलला भव्य मोर्चा

**दापोली** - रत्नागिरीतील खेड तालुक्यातील लोटे-परशुराम एमआयडीसी परिसरातील लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीविरोधातील आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. सोमवार ६ एप्रिल रोजी कोकण नागरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली ११ गावांतील नागरिक मोर्चा काढणार आहेत. लोटे औद्योगिक वसाहतीतील लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीकडून घातक पीफएस रसायनांचे उत्पादन केले जात असल्याचा आरोप आहे. यापूर्वी परिसरातील ११ ग्रामपंचायतींनी ग्रामसभांमधून ही कंपनी बंद करण्याच्या मागणीचे ठराव मंजूर केले आहेत. त्यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले आहे.

## रायगडच्या कर्जत तालुक्यातील सर्व ठेकेदारांचे ठिय्या आंदोलन

■ रायगड

**जिल्ह्यातील** कर्जत येथील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुमारे २०४ कोटी रुपयांची थकीत बिले न मिळाल्याने ठेकेदारांनी आक्रमक पवित्रा घेत कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांच्या केबिनमध्ये बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. तीन वर्षापासून बिले प्रलंबित असल्याने ठेकेदार संघटनेने हे पाऊल उचलले. निधी मिळेपर्यंत हटणार नसल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. अधिकारी वर्गाने शासनाकडे पाठपुरावा करून भरीव निधी आणावा यासाठी कर्जत तालुका ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. परंतु उपोषणाच्या दुसऱ्याच दिवशी कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी दोन दिवसांत भरीव निधी आणेन असे आश्वासन देऊन उपोषण सोडण्यास भाग पाडले. परंतु यावर्षी कुठल्याही शीर्षकाला एक रुपयाचा सुद्धा निधी प्राप्त होणार नाही याची खात्री पटल्याने संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांच्यासह सर्व ठेकेदारांनी चव्हाण यांच्या कार्यालयात बसून ठिय्या आंदोलन सुरू केले.

## राज्यातील महामार्गावरचा प्रवास महागला टोल दरात ३ ते ५ टक्क्यांची वाढ लागू

■ मुंबई

**राज्यातील** महामार्ग आणि एक्स्प्रेसवेवरील टोल दरात सरासरी ३ ते ५ टक्क्यांनी वाढ करण्यात आली असून ही वाढ आजपासून लागू झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या खिशाला अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत राज्यातील सुमारे ७० टोलनाक्यांवर, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ३५ प्रमुख टोलनाक्यांवर ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. कार, जीप, बस आणि



ट्रक अशा सर्व प्रकारच्या वाहनांसाठी टोल महागला आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर या दरवाढीमुळे सर्वसामान्य वाहनधारकांवर आर्थिक ताण वाढणार आहे. दरम्यान, टोल वसुलीची पद्धतही अधिक कडक करण्यात आली आहे. आता वाहनधारकांना प्रामुख्याने फास्टॅग किंवा यूपीआयद्वारेच टोल भरावा लागणार आहे. आजपासून नियम अधिक काटेकोर करण्यात आल्यामुळे, फास्टॅगमध्ये पुरेशी रक्कम नसल्यास दंड आकारला जाऊ शकतो. त्यामुळे प्रवासापूर्वी फास्टॅग सक्रिय आहे का आणि त्यामध्ये पुरेशी रक्कम आहे का, याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

## आर्थिक वर्षाची उत्साही सुरुवात सेन्सेक्स १,८०० अंकांनी उसळला

■ मुंबई

**आजपासून** सुरू झालेल्या नवीन आर्थिक वर्षाचे भांडवली बाजाराने मोठे दणक्यात स्वागत केले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स आज १,८०० अंकांनी उसळला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्येही तेजी दिसून आली.

मध्यपूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात भारतीय शेअर बाजारात घसरण झाली होती. चालू आठवडयाच्या पहिल्या आणि गेल्या आर्थिक वर्षाच्या व्यवहाराच्या शेवटच्या दिवशी सोमवारीदेखील बाजारात पडझड झाली होती. काल महावीर जयंतीची सुट्टी असल्याने बाजार बंद होता.आज १ एप्रिल रोजी बाजाराची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली. बाजार उघडताच सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये जोरदार खरेदी दिसून पान ७ वर

## कोल्हापूरला अवकाळी पावसाने झोडपले

**कोल्हापूर** - कोल्हापूरमध्ये आज दुपारी व संध्याकाळी काही ठिकाणी अवकाळी पावसाने झोडपले. शहरात आज दुपारपासून 'ऊन-पावसाचा खेळ' सुरू होता. दुपारी २ व ४ च्या सुमारास काही भागात पावसाने हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूरकर उकाड्याने हैराण होते. आज झालेल्या या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. नागरिकांना काही अंशी दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांसाठी अवकाळी पावसाचा इशारा (अलर्ट) दिला होता, त्यामध्ये कोल्हापूरचाही समावेश होता.

## पंतप्रधान मोदींचा आसाममध्ये चहा मळ्यात कामगारांशी संवाद

**आसाम विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसाम दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी दिब्रुगड जिल्ह्यातील एका चहाच्या मळ्याला भेट देत तेथील महिला कामगारांशी संवाद साधला. तसेच त्यांच्या सोबत सेल्फी काढत स्वतः चहाची पाने तोडली.**

■ आसाम

**यानंतर** नरेंद्र मोदी यांनी धेमाजी जिल्ह्यातील गोगामुख येथे आयोजित जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, आसाममधील ही निवडणूक विकसित आसामला विकसित भारताच्या दिशेने नेणारी आहे. भाजपा-एनडीए निश्चितच विजयाची हॅटट्रिक साधेल, तर काँग्रेस पराभवाची हॅटट्रिक करेल. काँग्रेसच्या तथाकथित 'राजकुमार' शतक



पराभवाचे शतक करणार आहे. काँग्रेसने सत्तेसाठी आसामच्या समाजात फूट पाडली आणि ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही काठांना एकत्र येऊ दिले नाही. काँग्रेसने ६०-६५ वर्षांत ब्रह्मपुत्रेवर फक्त तीन पूल बांधले. मात्र, डबल-इंजिन सरकारने गेल्या १०-११ वर्षांत पाच मोठे पूल पूर्ण केले. बोगीबील पूल आणि भूपेन हजारिका सेतू यांसारख्या प्रकल्पांमुळे पान ५ वर

## विलीनीकरणाबाबत तटकरेंनी सत्य मान्य केले! शशिकांत शिंदेंची टीका

■ मुंबई

**दोन्ही** राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यासंदर्भात चर्चा झाली होती. हे आम्ही पहिल्यापासून सांगत होतो.आम्ही सत्य सांगत होतो.पण त्यावेळी अशी चर्चा झाली नाही असे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि काही पदाधिकारी सांगत होते. पण उशिरा का होईना तटकरे यांनी सत्य सांगितले की अजित पवार यांची त्यांच्याशी विलीनीकरणाबाबत चर्चा झाली होती, असे शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज म्हटले.

शशिकांत शिंदे म्हणाले की, अजित पवार असताना विलीनीकरणाची जी चर्चा झाली होती, त्यामध्ये काय करायचे आणि काय नाही याबद्दल सविस्तर चर्चा झाली होती. अजित पवार गेल्यानंतर ज्यावेळी सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व पुढे आणायचा विचार झाला, हा त्यांच्या पक्षाचा निर्णय होता. नेता कोणाला करावे यामध्ये आम्ही सांगायची गरज नव्हती. आता ते सांगत आहेत की सुनेत्रा पवारांचे नेतृत्व तुम्हाला मान्य आहे का? यासंदर्भात त्यावेळी आमची कुठलीही चर्चा झाली नव्हती. त्यामुळे यावर काही बोलणे योग्य नाही. आता विलीनीकरणाचा हा मुद्दा आम्ही बाजूला ठेवला असून संघटना वाढवण्याकडे लक्ष देत आहोत. रोहित पवार यांच्यावर टीका करणे हा त्यांचा बालिशपणा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला आम्ही नाही तर त्यांचा मित्रपक्षच डॅमेज करत आहे.